रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक ३३७
www.ramprahar.com
मंगळवार, २४ जून २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## महाराष्ट्रात सक्ती फक्त मराठीची; हिंदीची नाही -मंत्री शेलार



**मुंबई :** महाराष्ट्रात फक्त मराठीची सक्ती असून राज्यात पहिलीपासून हिंदी भाषेची तिसरी भाषा म्हणून सक्ती करण्यात आलेली नाही, तर पूर्वीपासून पाचवी ते आठवीपर्यंत असलेली हिंदीची सक्ती आमच्या सरकारने काढून पर्यायी ऐच्छिक भाषा म्हणून हिंदी उपलब्ध करून दिली व अन्य पर्याय उपलब्ध करून दिले आहे. त्यामुळे राज्यात सध्या सुरू असलेल्या चर्चा या अवाजवी, अतार्किक आणि अवास्तव आहेत. आम्ही मराठीचे कट्टर आहोत तसेच विद्यार्थीहिताचे खंदे पुरस्कर्ते आहोत, अशी स्पष्ट भूमिका भाजप मुंबई अध्यक्ष तथा राज्याचे सांस्कृतिक कार्य, माहिती तंत्रज्ञानमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी सोमवारी (दि. २३) पत्रकार परिषद घेऊन मांडली. अन्य राज्यांत तीन भाषा असतील आणि आपण जर तो पर्याय दिला नाही, तर अन्य राज्यांच्या तुलनेत आपले विद्यार्थी मागे पडतील, असेही ते म्हणाले.

अंतरंग
रायगडात जून महिन्याच्या सरासरी ८० टक्के पाऊस/२
पैसे दुप्पट करण्याचे आमिष दाखवून फसवणूक/५
दुसऱ्या डावात राहुल, पंतची शानदार शतके/८

# लोकशाहीत संसदीय समित्यांचे स्थान महत्त्वपूर्ण

### मुख्यमंत्री फडणवीस यांचे प्रतिपादन; राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन

**मुंबई : प्रतिनिधी**

लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्या हस्ते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत संसद तसेच राज्य आणि केंद्रशासित प्रदेश विधीमंडळांच्या अंदाज समित्यांच्या राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन सोमवारी (दि. २३) मुंबई विधान भवन येथे झाले. संसदीय अंदाज समितीच्या ७५व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित या राष्ट्रीय परिषदेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थितांना संबोधित केले. लोकशाही व्यवस्थेत संसदीय समित्यांचे अत्यंत महत्त्वपूर्ण स्थान आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले.




उद्घाटन समारंभास राज्यसभेचे उपसभापती हरिवंश, विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, संसदीय अंदाज समितीचे अध्यक्ष डॉ. संजय जयस्वाल, महाराष्ट्र विधीमंडळ अंदाज समितीचे अध्यक्ष अर्जुन खोतकर आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, हिंदवी स्वराज्याचे सरसंस्थापक छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पवित्र भूमीत देशभरातील विधानमंडळाच्या अंदाज समित्यांचे अध्यक्ष व सदस्य यांच्या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन होत आहे याचा मला मनस्वी आनंद आहे. मी या कार्यक्रमाला केवळ राज्याचा मुख्यमंत्री म्हणून उपस्थित नाही, तर राज्याच्या अंदाज समितीवर सहा वर्षे काम केलेल्या एका सदस्याच्या भूमिकेतूनही उपस्थित आहे.

आपल्या संविधानाच्या रचनेनुसार विधीमंडळाच्या समित्यांना सभागृहांपेक्षा अधिक प्रभावी मानले जाते, कारण या समित्या केवळ अधिवेशनाच्या मर्यादित कालावधीत कार्यरत राहत नाहीत, तर वर्षभर प्रशासनाच्या कामकाजावर लक्ष ठेवतात. या समित्यांच्या कार्यप्रणालीमुळे संसद आणि राज्य विधीमंडळांना सरकारला उत्तरदायित्वाच्या चौकटीत ठेवणे शक्य होते. परिणामी लोकशाही अधिक सुदृढ आणि पारदर्शक बनते. अतिशय वैज्ञानिक पद्धतीने अर्थसंकल्पातील खर्चांच्या अंदाजाचे नियोजन या समितीच्या माध्यमातून केले जाते, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

अंदाज समितीमुळे राज्य शासनाच्या सर्व विभागांची जबाबदारी निश्चित होते. समितीच्या माध्यमातून प्रशासनावरही आवश्यक ती नियंत्रण ठेवण्यास मोठी मदत होते. त्यामुळे लोकशाही व्यवस्थेत या समित्यांचे अत्यंत महत्त्वपूर्ण स्थान आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले.

## नेत्यांच्या वाढत्या वाक्‌युद्धामुळे मनसे-‘उबाठा’ युती धोक्यात!

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे आणि उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे हे आगामी निवडणुकांसाठी एकत्र येण्याच्या चर्चा सुरू असताना, मनसेचे मुंबई विभाग अध्यक्ष संदीप देशपांडे सातत्याने ‘उबाठा’विरोधात आक्रमक वक्तव्य करत आहेत. या टीकेला संजय राऊतही प्रत्युत्तर देतात. देशपांडे आणि राऊत यांच्यातील या शाब्दिक युद्धामुळे राज आणि उद्धव यांची युती होण्याच्या शक्यता मावळत चालल्या आहेत.

राज ठाकरे यांनी सर्वप्रथम, ’महाराष्ट्राच्या भल्यासाठी आम्हा भावांमधील वाद मी बाजूला ठेवायला तयार आहे’, असे म्हटले होते. त्यावर उद्धव ठाकरे यांनीही सकारात्मक प्रतिसाद दिला होता. तेव्हापासून ठाकरे गट आणि मनसेच्या कार्यकर्त्यांमध्ये स्थानिक पातळीवर मनोमिलन सुरू झाले, मात्र अलिकडे दुसऱ्या फळीतील नेत्यांचे सूर बदलले आहेत.

मनसे नेते संदीप देशपांडे यांनी सोमवारी सोशल मीडियावर एक पोस्ट करीत ठाकरे गटावर जोरदार टीका केली. होय आम्ही नवीन आहोत, पण कधी ’केम छो वरळी’ म्हणून कोणाचे पाय चाटले नाहीत. ’जिलेबी अने फाफडा उद्धव ठाकरे आपडा’, असं म्हणालो नाही. मुस्लिमांची मते मिळवण्यासाठी २० हजार केसेस आपल्याच भावाच्या कार्यकर्त्यांवर टाकल्या नाही. आम्हाला अभिमान आहे आम्ही नवीन आहोत. तुम्ही जुने असून काय उ****, असे देशपांडे म्हणाले. आता यावर राऊत काय बोलणार याकडे लक्ष लागले आहे.

## पोलादपूरमध्ये बंधाऱ्याच्या प्रवाहात तरुण गेला वाहून

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर तालुक्यातील लोहारे तुर्भे पुलाच्या बंधाऱ्याजवळ पोहणाऱ्या तीन तरुणांपैकी एकजण अचानक पाण्याच्या प्रवाहात ओढला गेला आणि बेपत्ता झाला. ही घटना सोमवारी (दि. २३) सकाळी साडेअकराच्या सुमारास घडली. जोगेश सुरेन ओरन (वय २१) असे वाहून गेलेल्या व्यक्तीचे नाव आहे.

लोहारे तुर्भे गावाजवळील केटी बंधाऱ्याजवळ लार्सन अँड टूब्रो कंपनीचे तिघे कामगार दुपारी आंघोळ करण्यासाठी पाण्यात उतरले होते. तिघांपैकी एकाचा तोल जाऊन तो पाण्यात वाहून गेला. वाहून जाणाऱ्या व्यक्तीचा तीन रेस्क्यू टीमकडून शोध घेण्यात आला, मात्र या व्यक्तीचा शोध लागलेला नाही. दरम्यान, या वेळी एका रेस्क्यू टीमची बोट वाहत्या प्रवाहात कलंडून टीममधील सदस्य पाण्यात पडले. शिताफीने ते प्रवाहापासून दूर झाले. **(संबंधित वृत्त पान २ वर..)**





**उलवे नोड : रायगड जिल्हा भाजप कोअर कमिटीची तसेच नवनियुक्त मंडळ अध्यक्षांची बैठक राज्याचे मंत्री तथा पक्षाचे रायगड जिल्हा संपर्क मंत्री आशिष शेलार यांच्या प्रमुख उपस्थितीत सोमवारी झाली. या बैठकीला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, खासदार धैर्यशील पाटील, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार रविशेठ पाटील, आमदार विक्रांत पाटील, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी आमदार सुरेश लाड, ज्येष्ठ नेते सतीश धारप, बाळासाहेब पाटील, जे.एम. म्हात्रे, वाय.टी. देशमुख, अरुणशेठ भगत, रवी भोईर, आस्वाद पाटील, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. या वेळी मंत्री शेलार यांनी उपस्थित पदाधिकाऱ्यांशी संवाद साधून विविध विषयांवर मार्गदर्शन केले.**

## निवडक

### परीक्षेत कमी गुण मिळाल्याने पित्याने घेतला लेकीचा जीव

**सांगली :** ‘नीट’च्या सराव परीक्षेत कमी गुण मिळाल्यामुळे १६ वर्षीय मुलीचा तिच्या वडिलांच्या बेदम मारहाणीमुळे मृत्यू झाला आहे. सांगली जिल्ह्याच्या आटपाडी तालुक्यातील नेलकरंजी गावात शनिवारी रात्री ही घटना घडली. विशेष म्हणजे या घटनेतील आरोपी वडील एका शाळेत मुख्याध्यापक आहेत. मुलीच्या आईने दिलेल्या फिर्यादीनुसार आरोपी धोंडीराम भोसले यांना अटक करण्यात आली असून ते सध्या पोलीस कोठडीत आहेत.

### एमपीएससी परीक्षार्थींसाठी केवायसी प्रक्रिया बंधनकारक

**मुंबई :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) ऑनलाईन अर्ज प्रणालीत कोणताही अर्ज करण्यापूर्वी उमेदवारांना केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे सक्तीचे करण्यात आले आहे. उमेदवारांना आधार ऑनलाईन, आधार ऑफलाईन पेपरलेस डिजिटल, आधार ऑफलाईन पेपर आधारित किंवा नॉन-आधार ऑफलाईन अशा चार पद्धतीने केवायसी करता येईल. यामुळे उमेदवारांची ओळख अचूकरीत्या प्रमाणिकरण करता येणार असून फसवणूक व चुकीच्या माहितीला आळा बसेल.

## रायगड जिल्ह्याच्या शहरी भागात ३८९ इमारती धोकादायक


(संग्रहित)

**अलिबाग : प्रतिनिधी**


रायगड जिल्ह्यात महानगरपालिका, नगर परिषदा, नगरपंचायतींच्या हद्दीत ३८९ इमारती धोकादायक आहेत. त्यातील २२ इमारती शासकीय आहेत. धोकादायक इमारतींमधील नागरिकांना महाराष्ट्र नगर परिषद, नगरपंचायत अधिनियम १९६५च्या कलम १९५ अन्वये नोटीस बजावून सुरक्षितस्थळी स्थलांतरीत होण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी जिल्ह्यातील सर्व पालिकांना धोकादायक इमारती आणि धरणांचे सर्वेक्षण करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्देशानंतर पनवेल महानगरपालिका आणि सर्व नगर परिषदा, नगरपंचायतींनी आपले अहवाल जिल्हा प्रशासनाला सादर केले. यामध्ये प्राथमिक पाहणीत ३८९ इमारती धोकादायक असल्याचे दिसून आले. यात २२ शासकीय इमारती, तर उर्वरित ३६७ खासगी इमारतींचा समावेश आहे. पनवेल येथे सर्वाधिक ८०, त्या खालोखाल उरण ५१, खोपोली ७०, पेण ३८, महाड २७, माणगाव २४, मुरूड २२, श्रीवर्धन १५, पोलादपूर १३, रोहा ११, अलिबाग ९, म्हसळा व पाली प्रत्येकी आठ, कर्जत सात, खालापूर चार आणि माथेरानमध्ये दोन इमारती धोकादायक आहेत.

या सर्व इमारतींमधील रहिवाशांना महाराष्ट्र नगर परिषद, नगरपंचायत अधिनियम १९६५च्या कलम १९५ अन्वये नोटीस बजावण्यात आल्या आहेत. याचबरोबर इमारतींमधील रहिवाशांना तातडीने सुरक्षितस्थळी स्थलांतरीत होण्यास सांगण्यात आले आहे.

याशिवाय खालापूर, तळा, म्हसळा, माणगाव, सुधागड आणि पोलादपूर येथील नगरपंचायतींना धोकादायक इमारतींचे सर्वेक्षण करून तेथील रहिवाशांना सुरक्षितस्थळी स्थलांतरीत करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

## लोकनेते दि.बा. पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज पनवेलमध्ये जोड भजनी भारूड



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रकल्पग्रस्तांचे दैवत लोकनेते स्व. दि.बा. पाटील यांच्या १२व्या पुण्यतिथीनिमित्त मंगळवारी (दि. २४) जून रोजी सायंकाळी ७ वाजता पनवेल-उरण आगरी समाज मंडळाच्या वतीने पनवेलमध्ये जोड भजनी भारूड आयोजित करण्यात आले आहे.

पनवेल शहरातील महात्मा ज्योतिबा फुले सभागृहात (आगरी समाज हॉल) आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार विक्रांत पाटील, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, कामगार नेते महेंद्र घरत आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या वेळी गायक राजेंद्रबुवा जांभुळकर, सुभाष मुकादम व अनिल मुकादम यांचा जोड भजनाचा कार्यक्रम होणार आहे. याचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन पनवेल-उरण आगरी समाज मंडळाचे अध्यक्ष तथा ‘दिबां’चे पुत्र अतुल पाटील तसेच पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

शेतकरी, प्रकल्पग्रस्तांचे कैवारी अशी दि.बा. पाटील यांची ओळख राहिली आहे. भूमिपुत्रांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी आपले आयुष्य वेचले. त्यांच्या नेतृत्वाखाली उभारण्यात आलेल्या आंदोलनामुळे साडेबारा टक्के जमिनीचे तत्व सर्वत्र लागू झाले. अशा या झुंझार नेत्याला पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात येणार आहे.


## कोकण किनारपट्टीवर उंच लाटांचा इशारा

**मुंबई : प्रतिनिधी**

कोकण किनारपट्टीवर सोमवारी सायंकाळी ५.३०पासून बुधवारी (दि. २५) रात्री ८.३० वाजेपर्यंत उंच लाटा उसळण्याचा इशारा भारतीय राष्ट्रीय महासागर माहिती सेवा केंद्र (आयएनसीओआयएस)तर्फे देण्यात आला आहे. या काळात लहान होड्यांना समुद्रात न जाण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

याशिवाय राज्यात पुढील २४ तासांमध्ये रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यांसह पुणे घाट आणि सातारा घाट परिसरात ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. दरम्यान, राज्यातील पूर परिस्थिती नियंत्रणात असल्याचे राज्य आपत्कालीन कार्य केंद्राने कळविले आहे.

राज्यात सोमवारी सकाळी संपलेल्या २४ तासांमध्ये पालघर जिल्ह्यात सर्वाधिक ७३.३ मिमी, तर सोलापूर जिल्ह्यात सर्वात कमी ०.१ पावसाची नोंद झाली. ठाणे जिल्ह्यात पुरात वाहून एक व खड्ड्यामध्ये बुडून एका व्यक्तीचा, तर पुणे जिल्ह्यात नदीत वाहून एका व्यक्तीचा मृत्यू झाला आहे.



# आरोग्य, शिक्षण, रोजगारासह सर्वसामान्यांचे गृहस्वप्न साकारणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

**नागपूर: रामप्रहर वृत्त**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी प्रत्येक भारतीयाचे घराचे स्वप्न पूर्ण करायचा संकल्प केला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून गेल्या काही काळामध्ये जवळपास साडेतीन कोटी घरे तयार झाली आणि आता नवीन अडीच कोटी घरांचे बांधकाम सुरू झालेले आहे. महाराष्ट्रामध्येही ३० लाख घरे उपलब्ध होणार आहेत. आरोग्य, शिक्षण, रोजगारासह सर्वसामान्यांचे घराचे स्वप्न साकार करण्यास प्राधान्य असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.



नागपूर महानगरपालिकेतर्फे प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत मौजा वांजरा येथील जागेवर बांधण्यात आलेले ४८० सदनिकांचे हस्तांतरण व विविध विकास कामांचे लोकार्पण आज करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आणि महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे व वित्त राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांच्या उपस्थितीत प्रातिनिधिक स्वरूपात लाभार्थ्यांना सदनिकांच्या किल्ली सुपूर्द करण्यात आल्या.

नगर विकास विभागाचे प्रधान सचिव डॉ. के. एच. गोविंदराज, मनपाचे आयुक्त तथा प्रशासक डॉ.अभिजीत चौधरी, अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत, अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी., नगर विकास विभागाच्या विद्या हम्पय्या, अतिरिक्त आयुक्त अजय चारठाणकर, मनपाचे मुख्य अभियंता मनोज तालेवार, मनपाचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर, बांधकाम व्यावसायिक गौरव अग्रवाल, पीएमसीचे दिनेश वराडे यांच्यासह मनपाचे अधिकारी कर्मचारी व नागरिक यावेळी उपस्थित होते. प्रधानमंत्री आवास योजनेच्या उत्कृष्ट अमलबजावणी बद्दल मनपाच्या चमूचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि आशिष जयस्वाल यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

# बुडालेल्या तरुणाला वाचवताना रेस्क्यू टीमची नौका कलंडली

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील लोहारे तुर्भे पुलाच्या कोल्हापूर तंत्राच्या बंधाय़ाजवळ सोमवारी सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास पोहणाऱ्या तीन तरुणांपैकी एक तरुण अचानक पाण्याच्या प्रवाहात ओढला गेला. या घटनेनंतर सोमवारी दिवसभर नरवीर, काळभैरवनाथ व साळुंखे रेस्क्यू टीम यांच्यासह आपदा मित्र यांनी बेपत्ता तरुणाचा शोध घेत असतांना पाण्याच्या प्रचंड प्रवाहासमोर रेस्क्यू टीमची नौका पलटल्याने उपस्थितांच्या काळजाचा ठोका चुकला दिवसभर केलेला प्रयत्न सायंकाळपर्यंत असफल ठरुन शोधकार्य अर्ध्यावर सोडण्यात आले.



पोलादपूर तालुक्यातील लोहारे ते तुर्भे प्रवासासाठी उत्तर वाहिनी सावित्री नदीच्या पात्रावर बांधण्यात आलेल्या पुलालगतच्या केटी बंधाऱ्याच्या जवळील कातळाजवळ लार्सन अँड टूब्रो कंपनीचे तिघे कंत्राटी कामगार आंघोळ करण्यानिमित्त पोहण्यासाठी उतरले. यावेळी सावित्री नदीच्या पाण्याचा प्रवाह अतिशय वेगवान असल्याने त्यांच्यापैकी एक तरुण पाण्यात ओढला गेला आणि तो गटांगळ्या खात काही अंतरापर्यंत जात असताना बेपत्ता झाला.

या घटनेनंतर आपदा मित्र किरण पार्टे व संतोष मोरे आणि काळभैरवनाथ रेस्क्यू टीमचे दीपक उतेकर, दिनेश दरेकर, लक्ष्मण कळंबे, उमेश पालकर, दीपक उतेकर, अरुण मोहिते, नरवीर रेस्क्यू टीमचे रामदास कळंबे, साळुंखे रेस्क्यू प्रशांत साळूंके, नयन ठाकूर, धैर्यशील भोसले, पार्थ बुटाला तसेच सीस्केप महाडचे प्रेमसागर मेस्त्री आदींनी घटनास्थळी धाव घेतली. यावेळी पोलादपूर पोलीस ठाण्याचे पीएसआय पवार आणि पोलीस कर्मचारी तसेच तहसील कार्यालय तहसील कार्यालय पोलादपूरचे कर्मचारी यांनी उपस्थित राहून शोधकार्यामध्ये सहभाग घेतला.

यावेळी कोल्हापुरी तंत्राच्या बंधाऱ्याजवळील पाण्याच्या वेगवान प्रवाहामध्ये रिव्हर राफ्टिंगसाठी टाकण्यात येणारी नौका गेली असता ते अचानक कलंडली आणि रेस्क्यू टीम मधील सदस्य पाण्याच्या प्रवाहात कोसळले. सर्व रेस्क्यू टीम सदस्य शिताफीने प्रवाहापासून दूर झाले. त्यामुळे सर्वच जण नदीच्या किनाय़ापर्यंत पोहोचू शकले. कार्य पाहणाऱ्या सर्वच ग्रामस्थांच्या कायद्याचा ठोका चुकला.

# भाजपच्या वतीने घर घर संपर्क अभियान

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

भाजप महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रविंद्र चव्हाण आणि प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील यांच्या उपस्थितीत घर घर संपर्क अभियानास सिवूड्स येथे सुरुवात करण्यात आली. २३ जूनपासून ते २३ ऑगस्ट या कालावधीत अभियान सिवूडस –करावे विभागात राबविण्यात येणार असल्याचे संयोजिका अश्विनी दत्ता घंगाळे यांनी सांगितले.



भाजप सिवूडस– करावे मंडळाच्या वतीने स्व.श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या जयंती निमित्ताने घर घर संपर्क अभियान कार्यक्रमास सुरुवात सिवूड्स –करावेनगर येथून करण्यात आली. या अभियान कालावधीत भाजपचे कार्यकर्ते घरोघरी जाऊन जनतेच्या अडचणी ऐकतील त्यावर चर्चा करतील, शहरातील भविष्यातील विकास कामांबाबत नागरिकांचे मत जाणून घेतील, भाजप सरकारने केलेल्या कामांची माहिती देतील,महापालिका निवडणुकीसाठी जनतेच्या सूचना संकलित करतील,

या वेळी व्यासपीठावर भाजप जिल्हाध्यक्ष डॉ राजेश पाटील, माजी जिल्हाध्यक्ष रामचंद्र घरत, महिला मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष वर्षा भोसले, मंडळ अध्यक्ष सुधीर जाधव, कुणाल महाडिक, भास्कर यमगर,माजी मंडळ अध्यक्ष जयवंत तांडेल, राजेश राय,मंगल घरत, विकास पाटील, बापू दडस,धवल माने,श्रवण कुमार त्रिवेदी, देवेंद्र पॅथी, माधवसिंग राजपूत, सुहास वेखंडे, तसेच अभियानाच्या संयोजक अश्विनी दत्ता घंगाळे उपस्थित होते.

# खोपोली मुख्य डाक घरात चिखल

## विद्युत पुरवठा, संगणकही बंद

**खालापूर : प्रतिनिधी**

खालापूरचे मुख्य कार्यालय असलेल्या खोपोली शिळफाटा येथील पोस्ट कार्यालयाच्या इमारतीच्या छपरा वरील सिमेंट पत्रे फुटल्याने पावसाचे पाणी कार्यालयात पडुन कार्यालयाला डबक्याचे रुप आले आहे. याचा फटका महत्त्वाच्या कागदपत्रे व दस्तऐवज यांना बसला असून तो मौल्यवान ऐवज सांभळणे कर्मचाऱ्यांना मोठे जिकिरीचे झाले आहे.

खोपोली तील शिळफाटा येथे मुख्य पोस्ट कार्यालय आहे. तालुक्याचे डाक या ठिकाणाहूनच संकलन व वितरीत केले





जातात. या कार्यालयातून मोठ्या प्रमाणात कागदपत्रांचा साठा असतो. याठिकाणी पोस्ट मास्तरसह १७ कर्मचारी काम करतात. आरडी एजंट ग्राहकांची नेहमीच मोठी गर्दी असते. इमारतीवरील पत्रे फुटल्याने मुसळधार पावसामुळेपोस्ट कार्यालयात पाणीच पाणी झाले आहे.

पावसाच्या पाण्यामुळे कार्यालयात दुर्गंधी पसरली असून कर्मचारी नाक मुठीत धरून काम करीत आहेत. पाण्यामुळे कागदपत्रे, ट्रेझरीचे. कपाट भिजण्याची शक्यता आहे . वीजपुरवठा खंडीत असल्यामूळे अंधार आहे. कॉम्प्युटर बंद आहेत त्यामुळे नागरिकांची आणि कर्मचाऱ्यांची गैरसोय होत आहे.

**गळतीने कार्यालयात पाणीच पाणी झाल्याने महत्वाची कागपत्रे सांभाळणे जिकरीचे बनले आहे. त्यातच बीजपुरवठा खंडीत असल्यामुळे मोबाइलच्या टॉर्चवर कर्मचारी काम करीत आहेत. कार्यालयात चिखल झाल्याने नागरिकांची गैरसोय होवू नये म्हणून दुसऱ्या कार्यालयात जावून काम करीत आहेत**

**–बी.एल. नरोटे,**
**पोस्ट मास्तर**

# रायगड जिल्ह्यात जून महिन्याच्या सरासरी ८० टक्के पाऊस

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात मे महिन्यात यंदा विक्रमी पाऊस पडला. मे महिन्यात यंदा सरासरी ४५४.९८ मिमी पासवाची नोंद झाली आहे. जून महिन्यातदेखील चांगला पाऊस पडला असून २३ जूनपर्यंत जून महिन्याच्या सरासरीच्या ८० टक्के पाऊस पडला आहे. रायगड जिल्ह्यात लघु पाटबंधारे विभागाची १५ धरणे १०० टक्के भरली आहेत.

कोकणात मृग नक्षत्रापासून म्हणजेच ७ जूनपसून मोसमी पावसाला सुरुवात होते. त्यापूवी मे महिन्यात काही किरकोळ सारी बरसतात. मे महिन्यात पडणाऱ्या या पावसाला मान्सूनपूर्व पाऊस पाऊस म्हणतात. यंदा मे महिन्यात चांगला पाऊस पडला. मे मुसळधार पावसाने काही दिवस झोडपून काढले. अनेक घरांचे नुकसान झाले. पहिल्यांदाच मे महिन्यात असा पाऊस पडल्याचे सांगितले जाते. ३१ मे पर्यंत सरासरी ४५४.९८ पाऊस पडला. या पावसामुळे तलावांची पाणी पातळी वाढली. परंतु शेतकऱ्यांची नुकसान झाले. शेतात पाणी असल्यामुळे धूळ पेरणी करता आली नाही.

जून महिन्यात दिखील चांगला पाऊस पडत आहे. जून महिन्यात सरासरी ६५५ मीमी पाऊस पडतो. २३ जून पर्यंत ५३८.३० मीमी पाऊस पडला आहे. जून महिन्याच्या सरारीच्या ८२.१८ टक्के पाऊस पडला आहे. २३ जून पर्यंत ५०२.०८ टक्के पाऊस पडतो. यंदा २३ जून पर्यंत ५३८.३० मीमी पाऊस पडला आहे. २३ जूनपर्यंतच्या सरासरी पर्जन्यमानाच्या १०७ टक्के पाऊस पडला आहे. धरण क्षेत्रात देखील चांगला पाऊस पडला आहे. त्यामुळे तलावांमध्ये पाणीसाठ्यात वाढ झाली आहे. रायगड जिल्ह्यात लघु पाटबंधारे विभागाची २८ धरणे आहेत त्यातील १५ धरणे १०० टक्के भरली आहेत.

**तालुकानिहाय टक्केवारी**

अलिबाग १३० टक्के , मरुड १०४ टक्के, पेण १४३ टक्के, पनवेल ९७ टक्के, उरण १५७ टक्के, कर्जत ८७ टक्के, खालापूर १४० टक्के, सुधागड ११७ टक्के, माणगाव १०६ टक्के, तळा १०२ टक्के, महाड १०७ टक्के, पोलादपूर ९६ टक्के, श्रीवर्धन ८३, म्हसळा ११४ टक्के, रोहा १११ टक्के.



**खोपोली : भारतीय जनसंघाचे नेते श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या पुण्यतिथीनिमित्त भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या वेळी युवा मोर्चाचे डॉ. अनिकेत पाटील व इतरांनी श्रद्धांजली वाहताना मुखर्जी यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते यशवंत साबळे, माजी नगरसेवक सूर्यकांत देशमुख, माजी उपाध्यक्ष दिलीप पवार, विकास नाईक, अपर्णा साठे, विभा पाठक, गुप्ते, सुमती महर्षी, सीमा मोगरे, वाघ यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.**

# चारसूत्री भातलागवड शेतकऱ्यांसाठी वरदान; अवलंब करण्याचे आवाहन


**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यात सुधारित पद्धतीने लागवडीसाठी सहाय्यक कृषी अधिकारी उतरले शेतात भातपिकाच्या भरीव उत्पादनासाठी शेतकरी शेतात अहोरात्र घाम गाळतो. त्याच्या परिश्रमाला सुधारित पद्धतीच्या भात लागवडीची सांगड घातल्यास शेतकऱ्यांचे अनेक पटीने उत्पन्न वाढेल. यात शंका नाही. मात्र हे उत्पन्न वाढण्यासाठी शेतकऱ्याच्या खांद्याला खांदा लावून प्रत्यक्षात शेतात सहाय्यक कृषी अधिकारी उतरल्याने उत्पादनाबाबत मेटाकुटीला आलेल्या शेतकऱ्यांच्या अंगात नवचैतन्य संचारले आहेत. तळा तालुक्यात यंदाचे वर्षी कृषी विभागाच्या मार्गदर्शनाखाली सुधारित पद्धतीने चारसूत्री भात लागवड केली जात आहे. त्यामुळे हि भातशेती शेतकऱ्यांना वरदान ठरणार आहे.

मागील काही दिवसातील पावसाच्या दमदार हजेरी नंतर तळा तालुक्यामध्ये भात लागवडीला वेग आला आहे. परंतु यावर्षी पारंपारिक लागवडी पेक्षा चारसूत्री भात

लागवडीवर शेतकऱ्यांनी अधिक भर दिल्याचे दिसून येत आहे. यासाठी तळा कृषी विभागाकडून विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत.

ताम्हणे तर्फे तळे या गावांमध्ये चारसूत्री भात लागवडीचे प्रात्यक्षिके घेण्यात आली. ही प्रात्यक्षिके विलास धाडवे, सहादेव पाखर, जानू पाखर, सुरेखा चव्हाण यांच्या शेतावर घेण्यात आली असून प्रात्यक्षिक पाहण्यासाठी कृषी विभागामार्फत घेण्यात येत असलेल्या शेती शाळा या उपक्रमामधील शेतकरी उपस्थित होते. ही सर्व चारसूत्र पद्धतीने लागवड प्रात्यक्षिके सहाय्यक कृषी अधिकारी गोविंद पाशीमे मार्गदर्शनाखाली राबविली जात आहेत. तालुक्यामध्ये अनेक भागांमध्ये या आधुनिक पध्दतीचा अवलंब केला जात आहे. पारंपारिक भात लागवडीपासून शेतकऱ्यांना भाताचे उत्पादन मिळत नाही, त्यामुळे कृषी विभागाच्या पुढाकाराने चारसुत्री लागवड पध्दती विषयी जनजागृती करण्यात आली आहे. तालुक्यात सहाय्यक कृषी अधिकाऱ्यांनी गावागावात जाऊन चारसुत्री भात लागवड पध्दतीचे महत्व पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे. शेतकऱ्यांनी चारसुत्री भात लागवड करण्यावर भर दिल्याचे दिसून येत आहे. कमी रोपे, कमी खर्च तसेच कमी मजूर आणि उत्पादन अधिक यामुळे या पध्दतीने लागवड करण्यास शेतकरी सरसावले आहे.



**चारसूत्री पद्धतीने रोपे कमी लागतात अर्थात बियाणे बचत होते. हवा खेळती राहते व रोपांना सूर्यप्रकाश चांगला मिळतो. त्यामुळे कीड व रोगाला बळी पडण्याची शक्यता कमी असते. औषध फवारणी करण्यास तसेच तृण काढण्यास सोयीस्कर होते. खतांची व मजूर खर्चात बचत होते. भाताची वाढ चांगली होते व उत्पादन वाढते. कृषी विभाग चारसूत्री भातलागवड क्षेत्रात वाढ करण्यासाठी विशेष प्रयत्न करतेय.**

**–गोविंद पाशिमे,**
**सहाय्यक कृषी अधिकारी**

**अलिबाग : दत्ताजीराव खानविलकर एज्युकेशन ट्रस्टच्या चिंतामणराव केळकर विद्यालयाच्या २२व्या वर्धापन दिनानिमित्त विद्यालयाची पहिली विद्यार्थिनी व सहयोग पतसंस्थेच्या संचालिका श्रावणी योगेश मगर यांच्या हस्ते सहयोग पतसंस्था अलिबाग यांच्या रौप्य महोत्सवी निधीतून रुपये ११११११चा धनादेश प्रदान केला.**



## ब्राह्मण मंडळ रोहातर्फे संततधार अनुष्ठान

**रोहे : प्रतिनिधी**

ब्राह्मण मंडळ रोहा तर्फे २२ जून रोजी चांगले पर्जन्यमान होण्यासाठी श्री ओंकारेश्वर मंदिर रोहा येथे सूर्योदयापासून ते सूर्यास्तापर्यंत संततधार अनुष्ठान संपन्न झाले. या अनुष्ठानासाठी वे.मु.मंदार पेंडसे गुरुजी,विवेक बापट गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले अनुष्ठान यशस्वी होण्यासाठी ब्राह्मण मंडळ रोहा अध्यक्ष अमित आठवले, सचिव निखिल दाते आदींसह समाजबांधवांनी परिश्रम घेतले.

# डॉ. अजित पाठक यांची पब्लिक रिलेशन्स सोसायटी ऑफ इंडियाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

पब्लिक रिलेशन्स सोसायटी ऑफ इंडियाने डॉ. अजित पाठक यांची राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड जाहीर केली आहे. पब्लिक रिलेशन्समध्ये भारतातील पहिले डॉक्टरेट आणि ग्लोबल अलायन्स ऑफ पीआर अँड कम्युनिकेशन मॅनेजमेंटचे माजी सचिव डॉ. पाठक हे इंडियन ऑइल कॉर्पोरेशनमध्ये जनरल मॅनेजर म्हणून कार्यरत होते.

पब्लिक रिलेशन्स सोसायटी ऑफ इंडिया आणि इंटरनॅशनल पब्लिक रिलेशन्समधील त्यांच्या योगदानाची दखल घेत, त्यांना ले मेरिडियन गुरुग्राम येथे झालेल्या इंडिया असोसिएशन काँग्रेस दरम्यान मोस्ट इंस्पायरिंग लीडर अवॉर्ड प्रदान करण्यात आला, जिथे ३०० संघटनांनी सक्रिय सहभाग घेतला होता.

डॉ. पाठक हे इंटरनॅशनल पब्लिक रिलेशन्स असोसिएशनचे बोर्ड सदस्य देखील आहेत. त्यांच्या योगदान आणि वचनबद्धतेमुळे, पीआरएसआई ने त्यांना पुन्हा एकदा राष्ट्रीय अध्यक्षपदी निवडले आहे. डॉ. अजित पाठक यांना पीआरएसआई च्या राष्ट्रीय कार्यकारिणीचा विश्वास मिळाला असून ते अध्यक्षपदासाठी निवडले गेले आहेत. शनिवारी नवी दिल्ली येथे झालेल्या सोसायटीच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या निवडणुकीदरम्यान ही घोषणा करण्यात आली.

# आपण भाजपचे कार्यकर्ते हे आपले सौभाग्य!

## आमदार प्रशांत ठाकूर यांचे प्रतिपादन




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाचे आपण कार्यकर्ते आहोत हे आपले सौभाग्य आहे, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी नवीन पनवेलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या संकल्पसभेत केले.

मागील ११ वर्षांच्या कार्यकाळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देशात आमुलाग्र बदल घडले आहेत. देशाने जगभरात नावलौकिक मिळवला असून देशाच्या अर्थव्यवस्थेने जगाच्या तुलनेत महत्त्वपूर्ण झेप घेतली आहे. मागील ११ वर्षांतील याच सर्व कामांची माहिती नागरिकांना देण्यासाठी विकसित भारत संकल्प सभेचे आयोजन नवीन पनवेल मधील कर्नाटक हॉलमध्ये रविवारी (दि.२२) करण्यात आले होते.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी मोदी सरकारने २०१४ पासून राबवलेल्या सर्व योजना तसेच प्रमुख कामगिरींबद्दल माहिती देत मार्गदर्शन केले. तसेच भाजपचे प्रवक्ते यांनी मार्गदर्शन करत भारतीय जनता पक्षाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली विविध समाजकल्याणकारी योजना राबवून सर्वसामान्य जनतेचा विचार केला असल्याचे प्रतिपादन केले.

या सभेला भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, अ‍ॅड. प्रकाश बिनेदार, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी उपमहापौर सिताताई पाटील, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, नवीन पनवेल मंडळ अध्यक्ष दशरद म्हात्रे, भाजपचे प्रवक्ते महादेव गांगुर्डे, माजी नगरसेवक संतोष शेट्टी, एकनाथ गायकवाड, अ‍ॅड. मनोज भुजबळ, समीर ठाकूर, माजी नगरसेविका राजेश्री वावेकर, सुशिला घरत, वृषाली वाघमारे, माजी नगराध्यक्ष संदिप पाटील, गणेश पाटील, भिमराव पवार, ज्येष्ठ नेते सी. सी. भगत, किशोर चौतमोल, जगदीश घरत, प्रभाग १५ अध्यक्ष शांताराम महाडीक, प्रभाग १६ अध्यक्ष शिवाजी भगत, प्रभाग १७ अध्यक्ष विजय म्हात्रे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते.

या सभेत पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमीत्त भारतीय जनता युवा मोर्चा, नवीन पनवेल यांच्या आयोजित करण्यात आलेल्या निबंध स्पर्धे चा बक्षीस वितरण करण्यात आले.

या स्पर्धेत पाचवी ते सातवी या गटामध्ये प्रथम क्रमांक वेद बागवे, द्वितीय क्रमांक स्वराज काटकर आणि तृतीय क्रमांक जानवी राठोर यांनी पटकावला तर आठवी ते दहावी या गटात पहिला क्रमांक योगेश पाटील, दुसरा क्रमांक स्वरूप ठाकूर आणि तिसरा क्रमांक मुग्धा वाघमारे यांनी पटकावला. त्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र आणि बक्षिस देऊन गौरवण्यात आले.

# आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ वक्तृत्व स्पर्धेचा शानदार शुभारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोशिश फाउंडेशनच्या वतीने आयोजित आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ वक्तृत्व स्पर्धेच्या पहिल्या टप्प्याची सुरुवात सोमवारी कामोठ्यील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडियम स्कूलमध्ये झाली. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, संवाद कौशल्य व व्यक्तिमत्त्व विकास घडविणाऱ्या या उपक्रमातील वर्ग अंतर्गत फेरी अतिशय उत्साही वातावरणात पार पडली.



या वेळी युवा मोर्चाचे रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, समाजसेवक भाऊ भगत, मुख्याध्यापिका स्वप्नाली म्हात्रे, प्राचार्य अविनाश कुलकर्णी, मनोहर शिंगाडे, विनोद खेडकर, युवा मोर्चा कामोठे शहर अध्यक्ष तेजस जाधव, छबी कृष्ण क्षीरसागर, प्रवीण कोरडे, राहुल बुधे, किरण जाधव आदी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, वक्तृत्वकौशल्य आणि नेतृत्वगुणांची जोपासना व्हावी या हेतूने पनवेल महानगरपालिका आणि कोशिश फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ वक्तृत्व स्पर्धा २३ जून ते ३१ जुलैपर्यंत भव्य स्वरूपात आयोजित करण्यात आली आहे. कोशिश फाउंडेशनचे अध्यक्ष परेश ठाकूर यांच्या पुढाकाराने आणि मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा दरवर्षी यशस्वीपणे राबवली जाते. या वर्षी स्पर्धेचे तिसरे वर्ष असून १८ शाळांमधून सुमारे १४ हजार विद्यार्थी सहभाग घेणार आहेत. स्पर्धा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरणार आहे.



स्पर्धा वर्ग अंतर्गत फेरी, शाळा अंतर्गत फेरी आणि शालेय अंतिमफेरी होणार असून निवडक ६०० स्पर्धकांमधून अंतिम६० विजेते ठरणार आहेत. त्या अनुषंगाने नियोजन करण्यात आले आहे. त्या अंतर्गत सोमवारी या स्पर्धेच्या वर्ग अंतर्गत फेरीला सुरुवात झाली. यामध्ये पहिली ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर प्रभावी भाषणे सादर करत आपली मते प्रभावीपणे मांडली. मुलांचे सादरीकरण, तयारी आणि आत्मविश्वास पाहून शिक्षक, पालक आणि परीक्षक भारावून गेले.

या उपक्रमामध्ये गेल्या वर्षी हजार विद्यार्थी सहभागी झाले होते, तर यावर्षी सुमारे हजार विद्यार्थ्यांचा सहभाग अपेक्षित आहे. या उपक्रमात पनवेल महानगरपालिका अंतर्गत शाळांचाही समावेश आहे. या स्पर्धेची पुढील फेरी म्हणजे शाळा अंतर्गत फेरी लवकरच घेण्यात येणार आहे, ज्यामध्ये प्रत्येक वर्गातील निवडक विद्यार्थी पुढे जातील. त्यानंतर अंतिम फेरीत सर्वोत्तम वक्ते निवडले जातील.

**आमदार प्रशांत ठाकूर आणि कोशिश फाउंडेशनचे अध्यक्ष परेश ठाकूर यांनी विद्यार्थ्यांसाठी संवाद कौशल्य वाढवणाऱ्या आणि आत्मविश्वास निर्माण करणाऱ्या अशा उपक्रमाची संधी उपलब्ध करून दिली, त्याबद्दल आम्ही शाळेच्या वतीने मनःपूर्वक आभार व्यक्त करतो. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना स्वतःचे मत व्यक्त करण्याचे मुक्त व्यासपीठ लाभले.**

–स्वप्नाली म्हात्रे, प्राचार्य, लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज, कामोठे



**पनवेल :** खांदा कॉलनीमधील शिवम म्हात्रे याला शिक्षणासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या माध्यमातून चार लाख रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली आहे. शिवम म्हात्रे हा नेरूळ येथील डी.वाय. पाटील स्कूल ऑफ आर्युवेदमध्ये बॅचलर ऑफ आर्युवेदा अ‍ॅण्ड सर्जरीचे शिक्षण घेणार आहे. यासाठी मंडळच्या वतीने अर्थिक मदत करण्यात आली असून या मदतीचा धनादेश माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते सोमवारी देण्यात आला. भाजप कामगार मोर्चाचे प्रदेश सचिव संजय भगत, भाऊशेठ पाटील, मनोज म्हात्रे उपस्थित होते.



**उरण :** भारतीय जनसंघाचे संस्थापक डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांची पुण्यतिथीनिमित्त आमदार महेश बालदी संपर्क कार्यालयात डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी माजी नगराध्यक्ष सायली म्हात्रे, भाजप शहराध्यक्ष तथा माजी नगरसेवक कौशिक शाह, तालुका सरचिटणीस सुनील पाटील तसेच निखील माळी, भारत नाखवा, कांचन घरत आदी उपस्थित होते.

# सीकेटी उच्च माध्यमिक विद्यालयात एनएसएसतर्फे योग दिन उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत (एनएसएस) शनिवारी (दि.२१) जागतिक योग दिन साजरा करण्यात आला. पतंजली योगपीठ संस्थेतर्फे अलका आवाड यांनी बारावीच्या विद्यार्थ्यांकडून विविध योगासने करून घेतली. तसेच नवीन पनवेल येथील बाबूजी मेमोरियल आश्रम 'श्री रामचंद्र मिशन 'मेडिटेशन सेंटर तर्फे सुद्धा विद्यार्थ्यांसाठी योगासनांचे आयोजन केले होते.

विद्यार्थ्यांनी त्या ठिकाणी जाऊन योगगुरु सतीश बागुल यांच्या मार्गदर्शनाद्वारे विविध योगासने सादर केली. उत्तम आरोग्यासाठी योगासनांचे महत्त्व योगगुरुंनी विद्यार्थ्यांना पटवून दिले व नियमित योगासने करण्यासाठी विद्यार्थ्यांकडून शपथ घेतली. या वेळी ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य प्रशांत मोरे, मराठी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे, पर्यवेक्षक अजित सोनवणे , पर्यवेक्षिका स्वाती पाटील, तसेच विद्यार्थी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.




# उभ्या ट्रेलरला धडकून दुचाकीस्वाराचा मृत्यू

**पनवेल :** उभ्या टेलरला पाठीमागून आलेल्या मोटरसायकलीने धडक दिल्याने झालेल्या अपघातात मोटरसायकलस्वाराचा मृत्यू झाल्याची घटना पनवेल जवळील टी पॉईंटच्या पाठीमागे पुणे लेन सर्व्हिस रोड माताजी टेकडी समोर घडली आहे. ट्रेलर चालक सुशील पटेल याने पुणे लेन सर्व्हिस रोड माताजी टेकडीसमोर उभा होता. या वेळी पाठीमागून आलेली मोटरसायकलवरील चालकाने ट्रेलरला पाठीमागून धडक दिली. या अपघातात मोटरसायकलस्वाराचा मृत्यू झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## घरफोडीत तीन लाखांचा ऐवज चोरी

**पनवेल :** खारघर येथील एका घरात घरफोडी करत अज्ञात चोरट्याने तेथून सोन्याचे दागिने, लॅपटॉप आणि रोख रक्कम असा एकूण तीन लाखांचा ऐवज चोरून नेल्याची घटना घडली आहे. प्रीतीलता हिरे या बेलपाडा, खारघर येथे राहतात असून त्या कामाला गेल्या होत्या. तेथून त्या सायंकाळी घरी परतल्या असात त्यांना दाराचे कुलुप तोडण्यात आल्याचे आढळले. त्यावर त्यांनी घरात जाऊन पाहिले असता, चोरट्याने त्यांच्या घरातून १० ग्रॅम वजनाच्या सोन्याची अंगठी, रोख रक्कम आणि लॅपटॉप चोरून नेल्याचे त्यांना दिसून आले. या बाबतची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# पनवेल ते पंढरपूर सायकल वारीत 'सीकेटी'च्या संगीता जाधव यांचा सहभाग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सायकल चालवा पर्यावरण वाचवा हा संदेश देत तसेच शरीर स्वास्थ्यसह अध्यात्मिक वाढीला प्रोत्साहन देण्यासाठी पनवेल रायडर्स यांच्या वतीने पनवेल ते पंढरपूर सायकल वारीचे आयोजन करण्यात आले होते. ह्या सायकलवारीतर चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयाच्या सहशिक्षिका संगीता भगवान जाधव यासुद्धा सहभागी होऊन यशस्वीरित्या सायकलवारी पूर्ण केली.

भारत सरकारच्या क्रीडा मंत्रालयाच्या फिट इंडिया सायकलवारीत सहभाग नोंदवून संगीता जाधव (वय ५५) यांनी एक अनोखा विक्रम नोंदवला. त्यांच्यासोबत त्यांचे पती प्राध्यापक भगवान जाधव



(सीकेटी महाविद्यालय, खांदा कॉलनी) हेसुद्धा सहभागी झाले होते. पनवेल ते पंढरपूर सायकलवारीचे नियोजन २० ते २२ जून २०२५ या अवघ्या तीन दिवसात एकूण अंतर ३४५ किलोमीटर होते. हे अंतर त्यांनी सायकलद्वारे अवघ्या तीन दिवसांत पार केले.

या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल संस्थेच्या वतीने संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर, उपकार्याध्यक्ष वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी त्यांचे विशेष कौतुक केले. उच्च माध्यमिक विद्यालयात संस्थेच्या वतीने विद्यालयाचे प्राचार्य प्रशांत मोरे, कलाशाखा पर्यवेक्षक अजित सोनवणे, विज्ञानशाखा पर्यवेक्षिका स्वाती पाटील व सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वतीने सुंदर असे रोपटे देऊन संगीता जाधव यांचा सत्कार करण्यात आला.

# डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांना अभिवादन

**खारघर : रामप्रहर वृत्त**

भाजप खारघर जनसंपर्क कार्यालयात भारतीय जनसंघाचे संस्थापक डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांना अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात मुखर्जी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. फ्रेंड्स ऑफ बीजेपी खारघर शहराचे संयोजक व कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रभाकर तिजारे यांनी डॉ. मुखर्जी यांचे सांस्कृतिक राष्ट्रवाद, पंचप्रण, आणि काश्मीरमधील बलिदान या विषयांवर विचार मांडले.

सरचिटणीस दीपक शिंदे यांनी कलम ३७० रद्द करण्याचा ५ ऑगस्ट २०१९ रोजी झालेला ऐतिहासिक निर्णय हे डॉ. मुखर्जी यांच्या स्वप्नपूर्तीचे प्रतिक असल्याचे सांगितले. त्यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना अखंड भारत ही केवळ कल्पना नव्हे तर भविष्यदृष्टी आहे, असे उद्गारत त्यांच्या विचारांचा वारसा जपण्याचा निर्धार व्यक्त केला.

कार्यक्रमात उत्तर रायगड जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, सोशल मीडिया प्रदेश सह-संयोजिका बीना गोगरी, मनोज जोशी, राजवंत रायत यांनीही विचार मांडले.

या वेळी माजी नगरसेवक अभिमन्यू पाटील, निलेश बाविस्कर, अ‍ॅड. नरेश ठाकूर, समीर कदम, किरण पाटील, विजय पाटील, साधना पवार, नितेश पाटील, दिलीप जाधव, प्रविण बेरा, शैलेंद्र त्रिपाठी, भागवत गायकवाड, मधुमिता जेना, प्रिया दळवी, निर्मला यादव, निलम विसपुते, स्मिता आचार्य, मिनाक्षी अंथवाल, आदेश भोईर, दिलिप आडे, सुशीला शर्मा, रजनी शर्मा, बिंदिया सुरीला, अनिता दिवेदी, सीमा खडसे, जुमा चक्रवर्ती पदाधिकारी उपस्थित होते.



# विसपुते कॉलेज आणि एमकेसीएलमध्ये करार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारत सरकार तर्फे नवीन शैक्षणिक धोरण २०२०ची संपूर्ण देशामध्ये अंमलबजावणी करण्यास सुरवात झाली असून या धोरणामध्ये कौशल्य आधारित उच्च शिक्षण तसेच ऑनलाईन स्वअध्ययनावर भर देण्यात आला आहे. या नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीचा एक भाग म्हणून आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ संचालित श्री बापूसाहेब डी. डी. विसपुते कॉलेज ऑफ एज्युकेशन नवीन पनवेल व महाराष्ट्र ज्ञान महामंडळ (एमकेसीएल) मर्यादितदरम्यान शुक्रवारी (दि.२०) एक सामंज्यस्य करार करण्यात आला.

या करारांतर्गत महाविद्यामध्ये बीएड व एमएडच्या विद्यार्थ्यांसाठी एमकेसीएलतर्फे कौशल्य आधारित ऑनलाईन कोर्सेसना मान्यता देण्यात आली आहे. आपले नियमित पदवी शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांना इतर आधुनिक व्यावसायिक



ज्ञान मिळवण्याची व कौशल्य विकसित करण्याची संधी या कोर्सेसद्वारे मिळणार आहे, असे महाविद्यालयातर्फे सांगण्यात आले आहे.

या कोर्सेससंबंधी सामंज्यस्य करार करतेवेळी एमकेसीएलतर्फे विश्वास मते व महाविद्यालयातर्फे महाविद्यालयाच्या प्राचार्य अ‍ॅड. डॉ. सीमा कांबळे हे उपस्थित होते. या निर्णयासाठी आदर्श शैक्षणिक समूहाचे चेअरमन धनराज विसपुते व संचालिका संगीता विसपुते ह्यांनी महाविद्यालयाचे कौतुक केले आहे.

# गव्हाण विद्यालयात ऑलिंपिक दिनानिमित्त व्याख्यान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये जागतिक ऑलिंपिक दिनानिमित्त विद्यालयाचे क्रीडा शिक्षक सुरेश पारखे यांचे माहितीपूर्ण व्याख्यान झाले.



जागतिक ऑलिंपिक दिनानिमित्त त्यांनी संपूर्ण जगाला खिलाडू वृत्ती शिकवणाऱ्या आणि धर्म,जात,पंथ,वर्ण भेद विरहित एकसंघ शांतीचा संदेश देणाऱ्या ऑलिंपिक खेळांच्या स्पर्धेची स्थापना व या स्पर्धेचे नियोजन याबद्दल अभ्यासपूर्ण माहिती सांगून भारताच्या या खेळातील योगदाना विषयी भूमिका विशद केली. या वेळी त्यांनी पहिले ऑलिंपिक पदक विजेते भारतीय मल्ल खाशाबा जाधव यांच्यापासून तर भारताला सर्वाधिक सुवर्णपदके प्राप्त करून देत हॉकी या खेळाला प्रतिष्ठा प्राप्त करून देणारे हॉकीचे जादूगर मेजर ध्यानचंद व अन्य भारतीय खेळाडूंच्या ऑलिम्पिकमधील योगदानाविषयी त्यांनी माहिती सांगून विद्यार्थ्यांना प्रेरित केले.

या वेळी विद्यालयाचे उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर रवींद्र भोईर, इतर शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.


## संपादकीय

# पालकांना कोण समजावणार?

नीट सराव-चाचणी परीक्षेतील कमी गुणांवरून संतापलेल्या वडिलांनी केलेल्या मारहाणीत एका अवघ्या १७ वर्षांच्या मुलीचा मृत्यू होण्याची दुर्दैवी घटना सांगली जिल्ह्यातील आटपाडी तालुक्यातील नेलकरंजी येथे घडली आहे. डॉक्टर वा इंजिनीअर होण्यासाठी मुलांवर त्यांच्या क्षमतेपलीकडचा दबाव आणणे हे आपल्याकडे घराघरांतून दिसणारे चित्र आहे. स्वत:ची महत्त्वाकांक्षा मुलांवर लादताना पालकांनी किमान संतुलन राखणे आवश्यक असते याची आठवण या दुर्दैवी घटनेने करून दिली आहे.

**आपल्याकडे अनेक कुटुंबांमध्ये मूल जन्माला आले कीच त्याला डॉक्टर बनवायचे आहे की इंजिनीअर हे ठरवले जाते. आईवडील आपल्या अपत्याकडे एखाद्या 'प्रोजेक्ट'प्रमाणे पाहतात. प्रोजेक्टने ठरवलेले 'टार्गेट' गाठलेच पाहिजे असा दबाव लहानपणापासून ठेवला जातो. अपेक्षांची पूर्तता करण्यात मूल कुठल्याही कारणांनी अपयशी ठरल्यास पालक भयानक संतापतात, संतुलन गमावून बसतात. अशावेळी अविचारी संतापाच्या भरात किती भीषण टोक गाठले जाऊ शकते हे एका घटनेतून समोर आले आहे. मुलीला नीटच्या सराव-चाचणीत कमी गुण मिळाल्याने वडिलांनी रागाच्या भरात केलेल्या मारहाणीत मुलगी गंभीर जखमी होऊन तिचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना सांगलीतून समोर आली आहे. आश्चर्याची बाब म्हणजे या घटनेतील वडील माध्यमिक शाळेत मुख्याध्यापक आहेत. मुलीला कमी गुण मिळाल्याने ते मुलीला फैलावर घेत असताना मुलीने त्यांना उलट उत्तर करत 'पप्पा, तुम्हालाही कमीच गुण मिळाले होते ना? तुम्ही कुठे कलेक्टर झालात?' असा सवाल केला. मुलीच्या या वक्तव्याने अधिकच संतापलेल्या वडिलांनी जात्याच्या खुंट्याने तिला बेदम मारहाण केली. या मारहाणीत मुलगी गंभीर जखमी झालेली असताना तिला डॉक्टरकडे न नेता दुसऱ्या दिवशी सकाळीही वडील शाळेत निघून गेले असे समजते. नंतर मुलीला उपचारांसाठी रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी तपासून तिला मृत घोषित केले. ही दुर्दैवी घटना सांगली जिल्ह्यातील आटपाडी तालुक्यातील नेलकरंजी येथे घडली आहे. लेकीला अमानुष मारहाण करणाऱ्या पित्याचे नाव धोंडीराम भोसले असे आहे. शिक्षकी पेशातील व्यक्तीने असे संतुलन गमावून मुलीला मारहाण करणे तर अधिकच धक्कादायक आहे. मुलीच्या उलट उत्तरामुळे त्यांच्या वर्मावर बोट ठेवले गेले असावे व त्यातून अहंकार दुखावून त्यांनी तिला जबर मारहाण केली असावी असे दिसते. मुळातच आपल्या अपुऱ्या इच्छा, महत्त्वाकांक्षा मुलांवर लादू नका, त्यांना त्यांच्या कलाने, क्षमतेनुसार वाढू द्या हे परोपरीने सांगितले जात असताना, पण त्याकडे लक्ष देतो कोण अशीच परिस्थिती आहे. मुलगा असो वा मुलगी, अनेक मुलांच्या वाट्याला आज हे येते आहे. कुटुंब सुस्थितीत असले व अपत्याला सारे काही न मागता, हौसेमौजेसह उपलब्ध करून दिले जात असले तरी आईवडिलांनी निश्चित केलेल्या ध्येयाची पूर्तता त्याला वा तिला करून द्यायची आहे याची आठवण सतत करून दिली जाते. मुलांना या ध्येयनिश्चितीत ना निवडीचे स्वातंत्र्य असते ना नकाराचा अधिकार. मुलाच्या यशापयशावर पालकांचे व पर्यायाने मुलाचेही मानसिक स्वास्थ्य अवलंबून असते. या ताणातूनच आपल्याकडे कितीतरी विद्यार्थी आत्महत्येकडे वळताना दिसतात. कुठल्याही परीक्षेतील गुण वा यश हा जीवनमरणाचा प्रश्न नाही हे खरे तर पालकांनीच मुलांच्या मनावर बिंबवायला हवे. पण त्याकरिता ते आधी पालकांना पुरते कळायला हवे. आजच्या जीवघेण्या स्पर्धेच्या युगात पालकांना हे कोण समजावणार?**

# लोकनेते दि.बा. पाटील यांचे महाराष्ट्रातील ओबीसी समाजासाठी योगदान



महाराष्ट्रातील शेतकरी, कष्टकरी,प्रकल्पग्रस्त आणि ओबीसी समाजासाठी ज्यांनी आपलं संबंध आयुष्य खर्ची घातले त्या लोकनेते दि.बा. पाटील यांना महाराष्ट्र कधीच विसरू शकणार नाही.

१९८० साली ओबीसींच्या उन्नतीसाठी मंडल आयोगाने आपला अहवाल केंद्र सरकारला सादर केला, परंतु केंद्र सरकारने या अहवालाकडे दुर्लक्ष करीत तो अहवाल बासनात गुंडाळून ठेवला. त्यामुळे ओबीसी समाजात नाराजी पसरली.

या मंडल अहवालाची अंमलबजावणी केंद्र सरकारने त्वरित करावी यासाठी देशातील ओबीसी नेत्यांनी मोठ्या प्रमाणात आंदोलन सुरू केले. महाराष्ट्रात ॲड. जनार्दन पाटील, गोपीनाथ मुंडे, दि.बा. पाटील आदी नेते ओबीसी समाजासाठी सभा घेऊन मंडल आयोगाच्या अंमलबजावणीची मागणी करीत होते.

दि.बा. पाटील यांनी ओबीसी नेत्यांसह महाराष्ट्राच्या अनेक भागात दौरे काढून तेथे सभा घेतल्या आणि या मंडल आयोगासंबंधी ओबीसी समाजात मोठ्या प्रमाणात जनजागृती केली. काही काळ व्ही.पी. सिंग यांच्या बरोबरही राहून महाराष्ट्रभर यासाठी दौरा केला.

२४ डिसेंबर १९८२ रोजी विधानसभेचे विरोधी पक्षनेते म्हणून त्यांची दुसर्यांदा निवड झाली. १९८३मध्ये महाराष्ट्रात पुन्हा दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली.ती परिस्थिती पाहण्यासाठी दि.बा. पाटील यांनी महाराष्ट्रातील सर्व दुष्काळी जिल्ह्यांचा दौरा केला व संबंधितांच्या बैठका घेऊन दुष्काळ निवारणाच्या कार्यास गती दिली. या त्यांच्या कामाची सत्ताधारी व विरोधी अशा अनेक आमदारांनी प्रशंसा केली.

याचदरम्यान म्हणजे १९८३मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनी मंडल आयोगाच्या अंमलबजावणीसंदर्भात विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात चर्चा न करताच राज्य सरकारचे मत मंडल आयोगाच्या विरोधात असल्याचा अहवाल केंद्र सरकारकडे पाठवला. त्याविरोधात दि.बा. पाटील यांनी महाराष्ट्रातील विधानसभेत प्रश्न उपस्थित केला व सरकारला धारेवर धरले. त्याला सर्व विरोधी आमदारांनी पाठिंबा दिला. त्यामुळे सभागृहात मोठा गदारोळ झाला. विधानसभेचे कामकाज बंद पडले. त्या दिवशी सर्व वर्तमानपत्रात 'दिबां'च्या नावाची हेडलाईन झळकली.

दि.बा. पाटील यांनी केलेल्या या कामाची दखल नॅशनल युनियन ऑफ बॅकवर्ड क्लास या देशपातळीवरील संघटनेने घेऊन त्यांची कार्यकारिणीवर नियुक्ती केली. पुढे 'दिबां'चं कार्य पाहून त्यांची या संस्थेच्या महाराष्ट्र शाखेच्या अध्यक्षापदी निवड केली गेली.

मंडल आयोगाची अंमलबजावणी व्हावी यासाठी दि.बा. पाटील यांनी महाराष्ट्रातील विविध भागात भरपूर सभा घेतल्या. १९८३ साली याच मागणीसाठी मुंबईमध्ये नॅशनल युनियन आफ बॅकवर्ड क्लास या संघटनेच्या वतीने एक परिषद घेण्यात आली. या परिषदेच्या अध्यक्षपदी दि.बा. पाटील होते, तर उद्घाटक एस.एम. जोशी होते. त्यानंतर या परिषदेच्या नेत्यांच्या प्रयत्नांमुळे महाराष्ट्रात राखीव जागा समर्थन समितीची स्थापना करण्यात आली.त्याचे अध्यक्षपद दि.बा. पाटील यांना देण्यात आले. या समितीच्या वतीने महाराष्ट्रात अनेक परिषदा, सभा घेण्यात आल्या.

१९८६च्या फेब्रुवारी महिन्यात नॅशनल युनियन ऑफ बॅकवर्ड क्लास या संघटनेच्या वतीने मंडल आयोगाच्या अंमलबजावणीसाठी सत्याग्रहाचा सप्ताह आयोजित केला होता. दि.बा. पाटील यांचा त्यात प्रमुख सहभाग होता. या सप्ताहाच्या निमित्ताने मोर्चा काढण्यात आला होता या मोर्चात सहभागी होण्यासाठी उरण, पनवेलमधील १००हून अधिक कार्यकर्ते आमदार दत्ता पाटील आणि दत्तूशेठ पाटील यांच्या नेतृत्वाखाली सहभागी झाले होते.

पुढे मंडल आयोगाच्या अंमलबजावणीसाठीचे आंदोलन सुरूच होते. 'दिबां'च्या सभांचा धडाका चालूच होता. ५ सप्टेंबर १९८३ रोजी औरंगाबाद येथे मंडल आयोगाच्या समर्थनार्थ आयोजित करण्यात आलेल्या मेळाव्यात भाषण करताना दि.बा. पाटील यांना हृदयविकाराचा सौम्य झटका आला. त्यामुळे त्यांना औरंगाबाद येथील सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. तेव्हा ते विरोधी पक्षनेते होते. तेथे डॉ. झालटे त्यांच्यावर उपचार करीत होते. या आजाराचे वृत्त पनवेलला घरी न कळविण्याची सूचना त्यांनी आपले स्वीय सचिवास दिली होती, पण हे आजाराचे वृत्त सकाळी रेडिओवरील बातमीतून सर्वत्र पसरले. 'दिबां'च्या घरीही ही बातमी समजल्यावर घरचे लोक चिंताग्रस्त झाले. त्यामुळे दुसऱ्या दिवशी त्यांची पत्नी, मुलगी आणि पुतण्या औरंगाबादला गेले आणि त्यांनी हॉस्पिटलमध्ये 'दिबां'ची भेट घेतली. त्यांची आस्थेने विचारपूस केली. दुसऱ्या दिवशी त्यांची प्रकृती ठिक होती त्यामुळे ते सर्वजण 'दिबां'ना घेऊन पनवेलमध्ये येणार होते, परंतु सकाळी त्यांचा रक्तदाब वाढला. त्याचे कारण हॉस्पिटलमधील एक पेशंट फार तळमळत होता. त्यांच्याकडे नर्सेस दुर्लक्ष करतात, म्हणून 'दिबा' स्वत: उठून जात होते. त्यामुळे त्यांचा रक्तदाब वाढला.

यानंतर 'दिबां'नी आपल्या पत्नी, मुलगी आणि पुतण्याला घरी जाण्यास सांगितले. पुढे एका नर्सच्या सोबतीने त्यांना विमानाने मुंबईला आणण्यात आले. मुंबईत सेंट जॉर्ज हॉस्पिटलमधे ते १५ दिवस उपचार घेत होते.त्यांच्यावर डॉ. फाळके तेथे देखरेख करीत होते.त्यानंतर ते पन्हाळगडावर विश्रांतीसाठी १५ दिवस राहिले.

१९९० साली पंतप्रधान व्ही.पी. सिंग यांनी मंडल आयोगाच्या शिफारशीनुसार ओबीसी समाजासाठी शिक्षण व नोकऱ्यांमध्ये आरक्षण जाहीर केले. त्यानंतर मंडल आयोगाच्या विरोधात प्रतिगामी शक्तींनी गुजरात राज्यातील काही भागात हिंसक आंदोलन सुरू केले. त्यावेळी व्ही.पी. सिंग सरकारने जाहीर केलेल्या मंडल आयोगाच्या शिफारशींना पाठिंबा देण्यासाठी व गुजरातचे लोण महाराष्ट्रात येऊ नये, आलेच तर त्याचा मुकाबला करण्यासाठी दि.बा. पाटील यांनी राखीव जागा समर्थन समितीतर्फे मुंबईत एक परिषद घेऊन ओबीसी समाजाला सतर्क केले. या परिषदेला ओबीसी समाजासाठी काम करणारे अनेक नेते उपस्थित होते. त्यांनी 'दिबां'च्या प्रयत्नांना उत्स्फूर्त साद दिली.

दि.बा. पाटील यांचे ओबीसी समाजासाठीचे काम अशा प्रकारे अखंडपणे सुरू होते. महाराष्ट्र ओबीसी फेडरेशनचे ते अध्यक्ष होते. देशात ओबीसी समाजाची जनगणना झाली पाहिजे या मागणीसाठी दि.बा. पाटील यांनी जानेवारी २००१ साली दिल्लीत ५० जणांचे एक शिष्टमंडळ नेले होते. या शिष्टमंडळाने उपपंतप्रधान लालकृष्ण अडवाणी यांची भेट घेऊन त्यांच्या समोर ही मागणी मांडली. या शिष्टमंडळाने देशातील सर्व पक्षांच्या नेत्यांना भेटून त्यांना ओबीसी समाजाची जनगणना कसी आवश्यक आहे, हे 'दिबां'नी पटवून दिले. त्यामुळे सर्वपक्षीय मागास खासदारांनी या प्रश्नावर लोकसभेचे कामकाज रोखून धरले. मग सरकारनेही ओबीसी समाजाला आश्वासन दिले. एवढे वजन दिल्लीत 'दिबां'चे होते.

महाराष्ट्र विधिमंडळातले दि.बा.पाटील यांचे कामही अतुलनीय असेच होते. त्यांनी शेतकरी, प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न विधानसभेत पोटतिडकीने मांडून त्यांना न्याय देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला.

१ एप्रिल १९५७ रोजी विधानसभेत कूळ कायदा मंजूर करण्यात आला. तेव्हा या कूळ कायद्यातील पळवाटांवर 'दिबां'नी विधानसभेत सतत साडेचार तास अभ्यासपूर्ण भाषण करून सरकारला त्या दुरुस्त्या करण्यास भाग पाडले. अशा प्रकारे त्यांनी कमाल जमीन धारणा कायदा, रोजगार हमी योजना कायदा, महाराष्ट्र महसूल कायदा, सात बाराच्या उताऱ्यात तलाठ्याचे अधिकार काढून घेण्याचा कायदा, गर्भजल परीक्षेला विरोध करण्याचा कायदा, सिडकोसाठी जमीन घेण्याचा कायदा, एमआयडीसीसाठी शेतकऱ्यांच्या जमिनी घेण्याचा कायदा या सर्व वेळी 'दिबां'नी आपल्या अभ्यासपूर्ण भाषणाने सरकारला केलेल्या उपसूचना मान्य कराव्या लागल्या. मुंबईतील घर दुरुस्ती कायद्याला तर 'दिबां'नी २०० उपसूचना मताला टाकून पहाटे ५ वाजेपर्यंत विधानसभेचे कामकाज सुरू ठेवले होते.

दि.बा. पाटील बोलायला उभे राहिले की, सारी विधानसभा त्यांचे विचार ऐकण्यासाठी स्तब्ध व्हायची. मुख्यमंत्रीही निमुटपणे व एकाग्रतेने त्यांचे भाषण ऐकत असत. अन्यायाविरुद्ध बुलंद आवाज अशीच त्यांची ख्याती होती. विधानमंडळात आणि बाहेरही त्यांच्या नावाचा एक आदरयुक्त दबदबा होता.ते बोलायला लागले की, आक्रमक शैलीत बोलत. या त्यांच्या आक्रमक शैलीमुळे व अभ्यासपूर्ण भाषणामुळे त्यांना राज्य शासनातर्फे डिसेंबर १९९६ साली पहिला मानाचा विधानसभेतील उत्कृष्ट भाषण पुरस्कार देण्यात आला.

अशा या प्रकल्पग्रस्तसपीठ शेतकऱ्यांसाठी, कष्टकऱ्यांसाठी, ओबीसी समाजासाठी झटणाऱ्या या झुंजार लढवय्या नेत्याला त्यांच्या १२व्या स्मृतिदिनानिमित्त लाख लाख सलाम!

**-दीपक रा. म्हात्रे**



## बदलते तंत्रज्ञान

# नवीन इलेक्ट्रिक स्कूटर बजाज चेतक ३००१ लाँच

बजाज ऑटोने त्यांच्या आयकॉनिक चेतक रेंजमध्ये एक नवीन इलेक्ट्रिक स्कूटर बजाज चेतक ३००१ लाँच केली आहे. या स्कूटरची सुरुवातीची एक्स-शोरूम किंमत ९९,९९० रुपये आहे. हे आता चेतक लाइनअपमधील सर्वात स्वस्त मॉडेल आहे. ही स्कूटर लाल, पिवळा आणि निळा अशा तीन रंगांमध्ये उपलब्ध आहे. त्याची डिलिव्हरी लवकरच सुरू होण्याची अपेक्षा आहे. चेतक ३००१ ही टीव्हीएस आयक्यूब, ओला एस१ झेड, एथर रिझ्टा आणि हिरो विडा व्हीएक्स२ सारख्या इलेक्ट्रिक स्कूटरशी स्पर्धा करेल.



**बजाज चेतक रेंज, चार्जिंग आणि फीचर्स**

बॅटरी आणि रेंज: स्कूटरमध्ये ३.० ाथह बॅटरी आहे, जी जुन्या चेतक २९०३ च्या २.९ ाथह बॅटरीपेक्षा थोडी मोठी आहे. कंपनीचा दावा आहे की, ती एका चार्जवर १२७ किमी पर्यंत धावू शकते, जी २९०३ च्या १२३ किमी रेंजपेक्षा चांगली आहे. म्हणजेच, ती शहरातील रोजच्या प्रवासासाठी योग्य आहे.

मोटर आणि चार्जिंग: कंपनीने अद्याप मोटरबद्दल माहिती दिलेली नाही, परंतु त्यात ३.१ किलोवॅट (सुमारे ४.२ हॉर्सपॉवर) इलेक्ट्रिक मोटर असू शकते, जी त्याला ६२ किमी/ताशी कमाल वेग देईल.शहरातील वाहतुकीसाठी हा वेग पुरेसा आहे. यात ७५० वॅटचा चार्जर येतो, जो ३ तास ५० मिनिटांत बॅटरी ० ते ८०% पर्यंत चार्ज करतो.

वैशिष्ट्ये: यात मजबूत धातूची बॉडी, ब्लूटूथ कनेक्टिव्हिटी, स्मार्टफोन अलर्ट आणि हिल होल्ड फीचर सारखी स्मार्ट वैशिष्ट्ये आहेत, जी स्कूटरला उतारावर मागे सरकण्यापासून रोखते.

स्थिरता: चेतक ३००१ मधील बॅटरी फ्लोअरबोर्डखाली बसवण्यात आली आहे, ज्यामुळे स्कूटरचा तोल सुधारतो. यामुळे स्कूटर चालवणे सोपे होते, विशेषतः वळण घेताना. तसेच, त्यात ३५ लिटरची बूट स्पेस आहे, ज्यामध्ये हेल्मेट किंवा सामान सहज ठेवता येते.बजाजच्या चेतक श्रेणीमध्ये सध्या चार मॉडेल्स आहेत: नवीन पिढीच्या प्लॅटफॉर्मवर बनवलेली ही स्कूटर भारतीय रायडर्सना रेंज आणि परफॉर्मन्सच्या बाबतीत हवे असलेले सर्व काही देते. यामुळे रायडिंग सोपे आणि तणावमुक्त होते.

जर तुम्हाला दररोजच्या शहरी प्रवासासाठी परवडणारी, स्टायलिश आणि विश्वासार्ह इलेक्ट्रिक स्कूटर हवी असेल, तर चेतक ३००१ हा एक चांगला पर्याय असू शकतो.

# क्रांतिकारक दामोदर हरि चापेकर



## निमित्त

हरिभाऊ चापेकर या एका कीर्तनकारांच्या घरी २५ जून १८६९ रोजी दामोदर चापेकर यांचा जन्म झाला. लहानपणापासूनच टिळकांच्या विचारांचा प्रभाव दामोदर यांच्यावर होता. लहानपणापासूनच दामोदर चापेकर यांना व्यायामाची आवड होती. समवयस्क मित्रांना संघटित करून त्यांनी एक व्यायामशाळा सुरू केली. इंग्रजांकडून करण्यात येणार्या अत्याचाराची दामोदरपंतांना मनस्वी चीड होती. दामोदरपंतांचे लहान भाऊ बाळकृष्ण हरि चापेकर व वासुदेव हरि चापेकर दोघेही त्यांच्या प्रत्येक कार्यात सहभागी होत होते.

या तिन्ही भावांना चापेकर बंधू नावाने ओळखले जाते. हे तिन्ही भाऊ लोकमान्य टिळक यांच्या संपर्कात होते. टिळकांना ते गुरू मानत असत. त्यांचे वडील हरिपंत हे पुणे व मुंबई येथे हरिकथा सांगायचे. बालवयात तिघेही भाऊ हरि कीर्तनात वडिलांना मदत करायचे. त्यामुळे चापेकर बंधूंच्या शिक्षणात खंड पडला. विठ्ठलभक्ती करणार्या या मराठी कुटुंबाने देशासाठी प्राण अर्पण करणारे ३ तरणीबांड मुलेही दिली.

पुण्यामध्ये १८९७ मध्ये प्लेगची साथ आली. प्लेगपीडित रुग्णांना शोधून उपचार करण्याच्या नावावर इंग्रजांनी पुण्यातील घराघरात शोध मोहीम उघडली आणि अत्याचाराचा कहर केला. यामुळे इंग्रजांविरोधात असंतोष पसरू लागला. तत्कालीन जिल्हाधिकारी वाल्टर चार्ल्स रँड हा अत्यंत क्रूर, खुनशी होता. पुण्याच्या नागरिकांवर अत्याचार करण्यात तो सर्वात पुढे होता. बाळ गंगाधर टिळक आणि आगरकर यांनी या अत्याचाराविरोधात टीका केली. यामुळे त्यांना जेलमध्ये टाकण्यात आले. दरम्यान, दामोदरपंतांनी रँडची हत्या करण्याची योजना आखली. २२ जून १८९७ रोजी पुण्यातील गणेशखिंडीत रँड आणि त्याचा सहकारी लेफ्लनंट आयस्टर यांची एका कार्यक्रमाहून परतत असताना गोळ्या झाडून हत्या केली.

गणेश आणि रामचंद्र या द्रविड बंधूंनी केलेल्या गद्दारीमुळे इंग्रजांना हल्लेखोरांची नावे कळाली आणि त्यांनी दमोदरपंतांना अटक केली. त्यानंतर काही दिवसातच बाळकृष्ण व वासुदेव चापेकर, तसेच महादेव रानडे या सर्वांनाच पकडण्यात आले. इंग्रजांनी दामोदरपंतांना १८ एप्रिल १८९८ रोजी पुण्यातील येरवडा तुरुंगात फाशी दिली. त्यानंतर वासुदेव चापेकरांना ८ मे १८९९ रोजी तर बाळकृष्ण चापेकरांना आणि महादेव रानड्यांना १० मे १८९९ रोजी फाशी देण्यात आली.

येरवडा तुरुंगात असताना त्यांनी आपला जीवन प्रवास आणि क्रांतीकार्याचे तपशील नमूद करणारे १०० पानी आत्मवृत्त मोडीत लिहून काढले. ते वि.गो.खोबरेकर यांनी संपादित करून मराठीत आणले. १९७४ साली ते राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई या संस्थेने प्रकाशित केले. मुळात हे आत्मवृत्त म्हणजे खून करण्यास चापेकर का व कसे प्रवृत्त झाले याची हकीकत लिहिण्यास त्यांना सांगण्यात आले व येरवाडा जेलमध्ये असताना त्यांनी ८ ऑक्टोबर १८९७ रोजी ते पूर्ण केले. हे आत्मवृत्त एकूण मराठी साहित्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. एक तर एका निधड्या छातीच्या क्रांतिकारकाचे मोकळे ढाकळे आत्मवृत्त आहे. आपण क्रांतिकारक कसे होत गेलो, त्याचे क्रमवार वर्णन चापेकरांनी त्यात केले आहे.

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# पोटाशी संबंधित 'हे' आजार पावसाळा घेऊन येतो...

पाऊस आरामदायी असला तरी, आजारांचा धोकाही वाढवतो. या ऋतूमध्ये हेपेटायटीस-ई आणि ए संसर्ग विशेषतः वेगाने पसरतो. दूषित पाणी आणि अन्नामुळे उन्हाळ्यात आणि पावसाळ्यात त्यांचा धोका आणखी वाढतो. अशा परिस्थितीत, स्वच्छता आणि खबरदारी घेणे हा प्रतिबंध करण्याचा सर्वात प्रभावी मार्ग आहे.



हिपॅटायटीस-ए आणि ई आजाराचा थेट परिणाम यकृतावर होतो. त्याची सुरुवात यकृतातील जळजळीने होते. जेव्हा हा संसर्ग होतो तेव्हा ताप, उलट्या, भूक न लागणे इत्यादी लक्षणे ३-४ दिवसांपर्यंत राहतात. त्यानंतर कावीळ सुरू होते. डोळ्यांना पिवळेपणा आणि लघवीचा गडद पिवळा रंग ही कावीळची लक्षणे आहेत. कावीळ २-८ आठवडे टिकू शकते. या संसर्गाने ग्रस्त असलेल्या रुग्णाला पोट आणि शरीर दुखणे, अशक्तपणा, थकवा अशी तक्रार असू शकते. या संसर्गामुळे शरीराच्या अनेक भागांचे नुकसान होऊ शकते, हिपॅटायटीस ए आणि ई चे निदान करण्यासाठी, रुग्णाची रक्त तपासणी, यकृत कार्य चाचणी आणि काही महत्त्वाच्या अँटीबॉडी चाचण्या केल्या जातात.हिपॅटायटीस ए आणि ई ग्रस्त ९९.५% रुग्ण सहसा फक्त औषधांनी बरे होतात. फक्त ०.५% प्रकरणांमध्ये, संसर्ग यकृतावर इतका गंभीर परिणाम करतो की तीव्र यकृत निकामी होण्याचा धोका असतो . अशा परिस्थितीत, काही रुग्णांना आपत्कालीन यकृत प्रत्यारोपणाची आवश्यकता असू शकते. जे रुग्ण जेवू शकत नाहीत त्यांनी ताबडतोब डॉक्टरांशी संपर्क साधावा.

**सावधगिरी बाळगा**

घरी तयार केलेले ताजे संतुलित अन्नच खा. पावसाळ्यात अर्धवट शिजवलेले आणि कच्चे अन्न खाणे टाळा.शक्यतो रस्त्यावरील अन्न खाणे टाळा. उघड्यावर विकले जाणारे अन्न किंवा पेये खाणे टाळा.जर उरलेले अन्न योग्यरित्या साठवले नसेल तर ते खाऊ नका.आरओ पाणी प्या किंवा पाणी उकळून थंड करा आणि नंतर प्या. फळे आणि भाज्या पाण्याने पूर्णपणे धुऊनच वापरा.घरात आणि परिसरात स्वच्छतेची काळजी घ्या. तसेच वैयक्तिक स्वच्छतेची काळजी घ्या, जसे की- जेवण्यापूर्वी आणि शौचालयातून आल्यानंतर साबणाने हात धुवा. गर्भवती महिलांनीही स्वच्छतेची विशेष काळजी घ्यावी.

# पैसे दुप्पट करण्याचे आमिष दाखवून कोट्यवधी रुपयांची फसवणूक





**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड शहरातील नागरिकांना प्रसन्ना मोहन पुलेकर नामक स्थानिक व्यक्तीने शेअर मार्केट मधील गोल्डन बुल्स या कंपनी मध्ये ट्रेडींग करुन पैसे दुपट्ट करण्याचे अमिष दाखवुन कोट्यवधी रुपयाची फसवणूक केली आहे .अनेकांचे लोकांचे कोट्यवधी रुपये बुडाले असल्याने त्याच्यावर कायदेशीर कारवाइ व्हावी अशी मागणी सुपारी संघाचे माजी चेअरमन महेश भगतअॅड,रुपेश पाटील, अॅड् .अजित चोगले ,प्रणव गुरव यांनी पत्रकार परिषदेत केली आहे

प्रसन्ना पुलेकरने शेअर मार्केट मधील गोल्डन बुल्स या कंपनी मध्ये ट्रेडींग करुन मुरुड शहरातील नागरिकांना एक लाख रुपयास प्रत्येक महिन्याला दहा हजार रुपये व्याज देण्याचे अमिश दाखवत कोटच्वधी रुपये जमवले काही महिने व्याज दिले परंतु तदनंतर उडवा उडवीची उत्तरे देऊन जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न केल्याने असंख्य लोकांचे कोटच्वधी रुपये बुडाले असल्याची कैफियत पत्रकार परिषदेत मांडण्यात आली.

त्याच्या या अमिषाला भुलून शहर व मुरुड तालुक्यातील अन्य बाहेरील व्यक्तींनी प्रसन्ना पुलेकर यांचेकडे पैसे गुंतवायला सुरुवात केली. यामध्ये पेन्शनधारक लोकांनी आयुष्याची पुंजी सुद्धा त्याच्याकडे दिली. काहींनी एफ.डी. मोडली तर काहींनी अनेक पतपेढ्या व बँकांमधुन कर्ज काढले व लाखो रुपये त्याच्याकडे गुंतविले आहेत. सुमारे २५० हुन अधिक लोकांनी पैसे गुंतविले व अंदाजे हि रक्कम ५० कोटी पेक्षा जास्त रक्कम गुंतविले असल्याची माहिती यावेळी पत्रकार परिषदेमध्ये दिली.

सुरुवातीच्या काळात पैसे देवून लोकांची मने जिंकली. परंतु तदनंतर काही दिवसातच पैसे देण्यास टाळाटाळ करू लागला. प्रसन्ना सर्वांना सांगु लागला की, ट्रेडींग मधील माझा सहकारी पळून गेला आहे, मला तुमचे पैसे देता येणार नाही अशी बतावणी करायला लागला व उर्मटपणे उत्तरे देवू लागल्यावर सर्व लोकांना समजुन आले की, ते फसले आहेत.

सन २०२२ पासुन २०२५ पर्यंत या व्यक्तीने खोटी बतावणी करीत पैसे देतो देतो असे सांगून पैसे दिलेच नाही. फसवणुक झालेले सर्व मुरुडकर एकत्र आलेले असून प्रसन्ना पुलेकर याच्या विरोधात कायदेशीर कार्यवाही व्हावी यासाठी रायगड जिल्ह्याच्या जिल्हा पोलीस अधीक्षकांना भेटून सदर इसमाविरुध्द एफ.आय.आर. दाखल व्हावी हि प्रमुख मागणी करणार असल्याचे पत्रकार परिषदेत सांगण्यात आले.

यावेळी उपस्थित महिलांनी सांगितले कि,पुलेकर यांच्या पत्नी रिया पुलेकर याना भेटलो असता आम्हाला त्रास दिलात तर मी आत्महत्या करेन अशी धमकी देत आहेत.मग आमचे पैसे कसे मिळणार असा सवाल यावेळी उपस्थित करण्यात आला.मुरुड दिवाणी न्यायालयात प्रसन्ना पुलेकर याच्यावर चेक बाउंस प्रकरणातील एकूण आठ केसेस सुरु असून त्याच्यावर १३८ अन्वेय खटला सुरु असल्याची माहितीअॅड.अजित चोगले,अॅड. रुपेश पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे. पोलिस उपनिरीक्षक अविनाश पाटील यांनी सांगितले की,पुलेकर संबंधात या पूर्वी तक्रार अर्ज दाखल होता.परंतु त्यांच्यात समझोता झाल्याने हा अर्ज मागे घेण्यात आला होता.आता नव्याने तक्रार प्राप्त होताच या प्रकरणाची चौकशी करून योग्य ती कार्यवाही करणार आहोत.


## शिक्षक पाहिजेत

**डी.एन.सी. शिक्षण संकुल**
**गोपाळवाडी धाराशिव व चेंबूर मुंबई या**
**इंग्रजी/मराठी शाळेसाठी**
**डी.एड/बी.एड/बी.पी.एड/संगीत/चित्रकला**
**सर्व विषय शिक्षक तात्काळ पाहिजेत.**
**अर्ज करा.**
Email - shriganeshvidyamandir@gmail.com
dncshikshansankul1969@gmail.com


# मोटरसायकल चोराला २४ तासांत पकडले

**खालापूर : प्रतिनिधी**

खोपोली भाजी मार्केटकडे जाणाऱ्या रस्त्याच्या पार्कंगमधुन दोन मोटार सायकली चोरणार्याला खोपोली पोलिसांनी २४ तासांत अटक करून त्याच्या कडून चोरीच्या ३ मोटरसायकली जप्त केल्या. ज्यांची किंमत १ लाख ३० हजार आहे.

खोपोली भाजी मार्केटकडे जाणाऱ्या रस्त्याच्या पार्कंगमधुन दि. १२ जून २०२५ रोजी दोन मोटार सायकली चोरीच्या तक्रारी पोलिसांकडे आल्या होत्या. त्या अनुषंगाने खोपोली पोलीसांनी सीसीटीव्ही फुटेजच्या माध्यमातून शोध घेत चैतन्य ज्ञानेश्वर शिंदाडे, वय-३५ रा. मानखोरा,वावेतर्फे आसरे, ता. सुधागड, याची चौकशी करुन शिंदाडेकडून चोरीस गेलेल्या मोटार सायकल जप्त करण्यात आल्या.

## PANVEL MUNICIPAL CORPORATION
Tal. Panvel, Dist. Raigad - 410206

### Public Notice
Maharashtra Municipal Corporation Act, 1949 Section 210
Outward No. PMC/TPD/Roads/Panvel/26-25/981/2025
Date - 19/06/2025

Whereas, the Director of Town Planning, Maharashtra State in exercise of the powers conferred by section 31(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 vide Notification No.DP-Panvel (R)/TPV-3/16-93/1676, dated 16th march 1993, sanctioned the Panvel Municipal Council's Revised Development Plan and the said Revised Development Plan come into force with effect from 15th May 1993;

And whereas, the Director of Town Planning, Maharashtra State vide Notification No.DP-Panvel (R)/EP/TPV-3/53-94/2820, dated 27th April 1994, sanctioned the Panvel Municipal Council's Revised Development Plan's Excluded Part Development Plan and the said Revised Development Plan's Excluded Part Development Plan come into force with effect from 01th July 1994;

And whereas, Panvel Municipal Council Town Planning Scheme (1st Variation) Final sanctioned by Government dated 31st August 2009;

And whereas, the Government in exercise of the powers conferred by sub section 4 of section 3 of Maharashtra Municipal Corporation Act, 1949 vide Notification No. PNP.2914/VIP No.301/C.R. 354/UD-23, dated 25th September 2016 constituted the Panvel Municipal Corporation for the areas of whole area of Panvel Municipal Council and 29 surrounding revenue villages, which come into force with effect from 1st October 2016;

And whereas, Panvel Municipal Corporation has published its Revised and Draft Development Plan as per Section 26(1) of Maharashtra Regional and Town Planning Act-1966 in Maharashtra Extra Ordinary Gazette vide Extra Ordinary Gazette No. 72, Dated 08/08/2024;

And whereas, the roads shown in sanctioned development plan of erstwhile Panvel Municipal Council and Sanctioned Town Planning Scheme of Panvel town are narrow in consideration with existing heavy traffic and growing population of city, and needs to be widened;

And whereas, the existing 9.14 m wide road aligning from Final Plot No. 84/83 to Final Plot No. 90 is decided to be widened to 12.20 m and existing 7.60 m wide road aligning from by Patel Mohalla Jama Masjid to C.T.S No. 1119 is decided to be widened to 9.14 m Hon. Standing Committee, Panvel Municipal Corporation in exercise of the powers conferred by section 210 of Maharashtra Municipal Corporation Act, 1949 vide Resolution No.1262, dated 06/02/2025;

And whereas, Panvel Municipal Corporation has published the Notice Vide No. PMC/TP/Roads/Panvel/26-25/857/2025, Dated 21/04/2025 in Maharashtra Government Extra Ordinary Gazette No. 46, dated 23/04/2025 and published in Daily Ramprahar, Daily Navakal, Daily Krushival, Daily Apla Mahanagar, on Dated. 24/04/2025 for inviting suggestions and objections to the said proposed draft alignment of road widening of the existing 9.14 m wide road aligning from Final Plot No. 84/83 to Final Plot No. 90 is decided to be widened to 12.20 m and existing 7.60 m wide road aligning from by Patel Mohalla Jama Masjid to C.T.S No. 1119 is decided to be widened to 9.14 m Hon. Standing Committee, Panvel Municipal Corporation in exercise of the powers conferred by section 210 of Maharashtra Municipal Corporation Act, 1949 as shown in the Annexure 'A' and Annexure 'B' with the provisions contained in the section 210 of Maharashtra Municipal Corporation Act, 1949 from the public thereof within 30 days from the date of publication of the notice in Maharashtra Government Extra Ordinary Gazette;

And whereas, no any suggestions and objections received from public within prescribed period so that proposed road widening line has been sanctioned;

Therefore, as per the powers delegated by Panvel Municipal Corporation to the Commissioner, Panvel Municipal Corporation and in exercise of the powers, I Mangesh Citale, Commissioner and Administrator, Panvel Municipal Corporation here by sanctions the road widening as mentioned in the Annexure 'A' and plan appended hereto in Annexure 'B' showing the alignment of new road is kept open for the inspection of general public on all working days and in working hours in the office the of the Assistant Director of Town Planning, Panvel Municipal Corporation for a period of one month.

Place : - Panvel
Date - 23/06/2025

**Sd/-**
**(Mangesh Chitale)**
Commissioner
Panvel Municipal Corporation.

### Schedule - A
### Description of Road

Road widening of the existing 9.14 m wide road aligning from Final Plot No. 84/83 to Final Plot No. 90 is decided to be widened to 12.20 m and existing 7.60 m wide road aligning from Patel Mohalla Jama Masjid to C.T.S No. 1119 is decided to be widened to 9.14 m under section 210 of Maharashtra Municipal Corporation Act, 1949.

| Sr. No | Road Name | Existing Road width | Proposed Road width |
|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) |
| 1. | Road Aligning from Final Plot No. 84/83 to Final Plot No. 90, At- Panvel | 9.14 M (30 Feet) | 12.20 M (40 Feet) |
| 2. | Road Aligning from Patel Mohalla Jama Masjid to C.T.S No. 1119, At- Panvel | 7.60 M (25 Feet) | 9.14 M (30 Feet) |

Note :- Other than above listed final plot numbers, if any other final plot numbers existed while laying out the road widening then it will also be the part of the above proposed road widening.

### Schedule - B

Plan showing final road widening line is kept open for Inspection in the office of the Assistant Director of Town Planning, Panvel Municipal Corporation.

Place: - Panvel
Date -23/06/2025

**Sd/-**
**(Mangesh Chitale)**
Commissioner
Panvel Municipal Corporation.

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२५/प्र.क्र.२७५/२७८/२०२५

## पनवेल महानगरपालिका
ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

### जाहीर प्रकटन
(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २१० अन्वये)
जा.क्र.पमपा/नरवि/रस्ते/पनवेल/२६-२५/९८१/२०२५
दिनांक : १९/०६/२०२५

ज्याअर्थी, पूर्वाश्रमीच्या पनवेल नगरपरिषद हद्दीची सुधारित विकास योजना संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य यांनी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ मधील कलम ३१(१) अन्वये अधिसूचना क्र.वि.यो. पनवेल (सु.)/टीपीव्ही-३/१६-९३/१६७६, दिनांक १६ मार्च १९९३ अन्वये मंजूरी दिलेली आहे आणि उक्त सुधारित विकास योजना दिनांक १५ मे १९९३ पासून अंमलात आली आहे;

आणि ज्याअर्थी, पनवेल नगरपरिषद हद्दीतील वगळलेल्या भागाची विकास योजना संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य यांनी अधिसूचना क्र.वि.यो. पनवेल (सु.)/ईपी/टीपीव्ही-३/५३-९४/२८२०, दिनांक २७ मार्च १९९४ अन्वये मंजूरी दिलेली आहे आणि उक्त वगळलेल्या भागाची विकास योजना दिनांक ०१ जुलै १९९४ पासून अंमलात आली आहे;

आणि ज्याअर्थी, पनवेल नगररचना परियोजना क्र.१ (प्र. फे.) अंतिम शासनाने दि.३१/०८/२००९ रोजी मंजूर केली आहे;

आणि ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ३च्या पोटकलम (४) नुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग अधिसूचना क्रमांक पनप-२९१४/व्हीआयपी सं.क्र. ३०१/प्र.क्र.३५४/नवि-२३,दि.२५ सप्टेंबर २०१६ अन्वये पनवेल नगरपरिषदेचे संपूर्ण क्षेत्र व २९ महसुली गावांच्या क्षेत्रासाठी पनवेल महानगरपालिकेची स्थापना करण्यात आली असून ती दिनांक १ ऑक्टोंबर २०१६ पासून अस्तित्वात आली आहे;

आणि ज्या अर्थी, पनवेल महानगरपालिकेची सुधारित व एकत्रित प्रारूप विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियमचे १९६६ चेकलम २६(१) अन्वये दि. ०८/०८/२०२४ रोजी महाराष्ट्र शासन असाधारण राजपत्र क्र. ७२ नुसार प्रसिद्ध करण्यात आली आहे;

आणि ज्याअर्थी, पूर्वाश्रमीच्या पनवेल नगरपरिषद सुधारित मंजूर विकास योजना व मंजूर नगररचना परियोजना मधील रस्ते सध्याच्या सार्वजनिक वाहतुकीच्या दृष्टीने अरुंद आहेत व शहराची वाढती लोकसंख्या, वाहतूक व पार्कींगची गरज विचारात घेता उक्त रस्त्यांचे रुंदीकरण करणे आवश्यक आहे;

आणि ज्याअर्थी, पनवेल महानगरपालिका हद्दीतील मौजे-पनवेल येथील अंतिम भूखंड क्र. ८४/८३ पासून अंतिम भूखंड क्र. ९० पर्यंतचा विद्यमान ९.१४ मी. (३० फुट) रूंदीचा रस्ता १२.२० मी. (४० फुट) करणे व पटेल मोहल्ला जामा मशीद पासून सि.टी.एस. नं. १११९ पर्यंतचा विद्यमान ७.६० मी. (२५ फुट) रूंदीचा रस्ता ९.१४ मी. (३० फुट)रूंदीचा रस्ता करणेबाबत निर्णय पनवेल महानगरपालिका स्थायी समिती सभा ठराव क्र.१२६२, दि.०६/०२/२०२५ अन्वये झाला आहे;

आणि ज्याअर्थी, परिशिष्ट 'अ' व परिशिष्ट 'ब' मध्ये नमूद केलेल्या पनवेल महानगरपालिका हद्दीतील मौजे-पनवेल येथील अंतिम भूखंड क्र. ८४/८३ पासून अंतिम भूखंड क्र. ९० पर्यंतचा विद्यमान ९.१४ मी. (३० फुट) रूंदीचा रस्ता १२.२० मी. (४० फुट) करणे व पटेल मोहल्ला जामा मशीद पासून सि.टी.एस. नं. १११९ पर्यंतचा विद्यमान ७.६० मी. (२५ फुट) रूंदीचा रस्ता ९.१४ मी. (३० फुट) रूंदीचा रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम २१० अन्वये १८.२४ मी. रूंदीची नियमित रेषा विहीत करण्याबाबत या कार्यालयाचे जाहीर प्रकटन जा.क्र. पमपा/नरवि/रस्ते/पनवेल/२६-२५/८५७/२०२५, दि. २१/०४/२०२५ अन्वये महाराष्ट्र शासन असाधारण राजपत्र क्र. ४६, दि.२३/०४/२०२५ व दि. २४/०४/२०२५ रोजीच्या दै. रामप्रहार, दै. नवाकाळ, दै. आपल महानगर, दै. कृषीवल वृत्तपत्रात प्रसिद्धी देऊन वरील प्रकटन शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध झालेल्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत नागरीकांकडून हरकती व सुचना मागविण्यात आलेल्या आहेत;

आणि ज्याअर्थी, वरील रस्त्याच्या रूंदीकरण बाबत नागरीकांकडून विहित मुदतीत कोणत्याही हरकती व सूचना प्राप्त झाल्या नसल्याने रस्ता रूंदीकरण व संरेखांकन अंतिम मान्यता देण्यात आली आहे;

त्याअर्थी, मी मंगेश चितळे, आयुक्त तथा प्रशासक, पनवेल महानगरपालिका मला प्राप्त अधिकारांन्वये खालील परिशिष्ट 'अ' मध्ये विनिर्दीष्ट केलेल्या रस्ता रूंदीकरण व परिशिष्ट 'ब' मध्ये नकाशात दर्शविल्या प्रमाणे रस्ता रूंदीकरण रेषा मंजूर करीत आहे. सदर परिशिष्ट 'अ' व परिशिष्ट 'ब' च्या प्रति नागरीकांच्या पाहणी करीता सहाय्यक संचालक, नगररचना विभाग, पनवेल महानगरपालिका यांचे कार्यालयात कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत नागरीकांच्या अवलोकनार्थ एक महिन्याच्या कालावधीसाठी उपलब्ध राहील.

ठिकाण :- पनवेल
दिनांक : २३/०६/२०२५

**सही/-**
**(मंगेश चितळे)**
आयुक्त तथा प्रशासक
पनवेल महानगरपालिका

### परिशिष्ट - अ
### रस्त्याचे संक्षिप्त विवरण

पनवेल महानगरपालिका हद्दीतील मौजे-पनवेल येथील अंतिम भूखंड क्र. ८४/८३ पासून अंतिम भूखंड क्र. ९० पर्यंतचा विद्यमान ९.१४ मी. (३० फुट) रूंदीचा रस्ता १२.२० मी. (४० फुट) करणे व पटेल मोहल्ला जामा मशीद पासून सि.टी.एस. नं. १११९ पर्यंतचा विद्यमान ७.६० मी. (२५ फुट) रूंदीचा रस्ता ९.१४ मी. (३० फुट) रूंदीचा रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम २१० अन्वये नियमित रेषा विहीत करणे.

| अ.क्र. | रस्त्याचे नाव | विद्यमान रस्त्याची रूंदी | प्रस्तावित रस्त्याची रूंदी |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | मौजे-पनवेल येथील अं.भू.क्र ८४/८३ पासून अं.भू.क्र ९० पर्यंतचा रस्ता. | ९.१४ मी. (३० फुट) | १२.२० मी. (४० फुट) |
| २. | मौजे- पनवेल येथील पटेल मोहल्ला जामा मशीद पासून न.भू.क्र. १११९ पर्यंतचा रस्ता. | ७.६० मी. (२५ फुट) | ९.१४ मी. (३० फुट) |

**टीप :-** वरील रस्ता रुंदीकरणाची प्रत्यक्ष आखणी करते वेळी वरील बाधित जागेव्यतिरिक्त इतर जागा बाधित होत असल्यास सदरची जागा ही प्रस्तावित रस्ता रुंदीकरणाचा भाग समजण्यात येईल.

### परिशिष्ट - ब

अंतिम रस्ता रुंदीकरण प्रत्यक्ष संरेखांकन दर्शविणारा नकाशा नागरीकांच्या पाहणी करीता सहाय्यक संचालक, नगररचना विभाग, पनवेल महानगरपालिका यांचे कार्यालयात खुला ठेवण्यात आलेला आहे.

ठिकाण : पनवेल.
दिनांक : २३ /०६/२०२५

**सही/-**
**(मंगेश चितळे)**
आयुक्त तथा प्रशासक
पनवेल महानगरपालिका

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२५/प्र.क्र.२७५/२७८/२०२५

## पनवेल महानगरपालिका
ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

### जाहीर निविदा

पनवेल महानगरपालिकेमार्फत Development and maintenance of garden and roadside plantation in the municipal Area for Miyawaki Plantation at Pisarve Village. या कामाकरिता जाहीर ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचा तपशील |
|---|---|
| १ | Development and maintenance of garden and roadside plantation in the municipal Area for Miyawaki Plantation at Pisarve Village. |

सदर निविदा महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.२४/०६/२०२५ रोजी प्रसिध्द होईल. सदर निविदा संकेतस्थळावर दि. ०३/०७/२०२५ पर्यंत उपलब्ध राहील. इच्छुक निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

दिनांक : २३/०६/२०२५

जा.क्र.पमपा/जनसंपर्क/३१२५/२७७/२८०/२०२५

**सही/-**
**उपायुक्त (पर्यावरण)**
पनवेल महानगरपालिका

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत खाली नमूद केलेल्या इसमांकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे व तसे खरेदीखत ही त्यांचेबरोबर केलेला आहे.

तरी सदरहू मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेन्ट, साठेकरार, फरोक्त, खरेदीखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासून ७ दिवसाच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषेद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल यांची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**जमिनीचे वर्णन**
**मौजे उमरोली, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड.**

| गट/सर्व्हे नंबर | उपविभाग /हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकार रू.पै. | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| ३ | ४ | जिरायत ०-१५-४० पो.ख. ०-०६-८० **एकूण ०-२२-२०** | २.२५ | अशोक दिनकर डांगरकर |

पनवेल.
दिनांक : २३/०६/२०२५

**सही /-**
**अॅड. जयवंत एकनाथ भोपी**
अॅडव्होकेट

शॉप नं. १३, वरद विनायक कॉम्प्लेक्स, प्लॉट नंबर ३, सेक्टर नंबर ५, गुरूद्वारा समोर, नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.

# पनवेल लोकल मार्गावर पाच महिन्यांत २९ मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

रेल्वेच्या तिन्ही उपनगरीय रेल्वे मार्गावर दरवर्षी होणाऱ्या अपघाती घटनांमधून बळी जाणाऱ्यांची संख्या चिंता करायला लावणारी असते. त्यात नुकतीच ठाणे दरम्यानच्या दिवा-मुंब्रा मार्गावर झालेल्या अपघातात काही प्रवाशांचा बळी जाण्यासह अनेक जण जखमी झाले. या घटनेमुळे रेल्वेतून दैनंदिन प्रवास करणाऱ्या प्रवाश्यांच्या सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आलेला आहे.



पनवेल लोहमार्ग पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रेल्वे मार्गांवर यंदा जानेवारी ते मे या पाच महिन्यांच्या कालावधीत झालेल्या अपघाती घटनांमधून २९ जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. तर ३१ जणांना जखमी व्हावे लागले असल्याची माहिती सुत्रांनी दिली. अन्य उपनगरी मार्गाच्या तुलनेत हा मार्ग कमी वर्दळीचा व सुरक्षित समजला जात होता, मात्र हा मार्गही आता गर्दीचा व जिवघेणा ठरत आहे.

दरम्यान, रेल्वे पोलिसांकडून विविध प्रकारची जनजागृती केल्यानंतरही बेफिकीरपणाचे दर्शन घडवून शॉर्टकटसाठी जीव धोक्यात घालून रेल्वे रूळ ओलांडण्याची मानसिकता काही केल्या कमी होतांना दिसत नाही. पनवेल लोकल मार्गावर रूळ ओलांडतांना लोकलची ठोकर लागून १६ जणांचा मृत्यू झाला आहे. तर गाडीतून पडून पाच जणांचा, नैसर्गिकरित्या आठ जणांचा अशा एकूण २९ जणांचा मृत्यू झाला आहे. यात तब्बल २८ पुरुष व एक महिला यांचा समावेश आहे. जखमींमध्ये, गाडीतून पडून १७ जण, पाय घसरून एक व इतर कारणांनी दोन व नैसर्गिक कारणांनी ११ जण असे एकूण ३१ जण जखमी झाले आहेत. यात २२ पुरुष व नऊ महिला यांचा समावेश आहे. हार्बर मार्गावरील पनवेल लोहमार्ग हद्दीत बेलापूर, खारघर, मानसरोवर, खांदेश्वर, पनवेल व मेल मार्गावरील स्थानके अशा स्थानकांचा समावेश आहे.

दरम्यान, रेल्वे कायद्यानुसार, एखादी व्यक्ती अनधिकृतपणे रेल्वे रूळ ओलांडतांना पथकांच्या हाती लागल्यास सदर व्यक्तीला एक हजार रूपये दंड किंवा सहा महिन्यांपर्यंत तुरुंगवास अशा शिक्षेची तरतुद आहे, मात्र त्यानंतरही शॉर्टकट पायी नागरिकांचा बेफिकीरपणा कमी होत नसल्याने या प्रकारातून बळींची संख्या कमी होण्याऐवजी दिवसेंदिवस सर्वत्र वाढतांना दिसत आहे.

## निवडक



### शैक्षणिक शिष्यवृत्तीचे वाटप

**नवी मुंबई :** सानपाडा येथील नवी मुंबई महानगरपालिकेच्या श्री दत्त विद्यामंदिर शाळेत श्रीराम राधाकृष्ण मेमोरियल ट्रस्टच्या वतीने गरीब, गरजू आणि आई किंवा वडील नसणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करण्यासाठी एकूण तीन लाख ३० हजार रुपये शैक्षणिक शिष्यवृत्तीसाठी वाटप करण्यात आले. या कार्यक्रमात एकूण ६५ विद्यार्थ्यांना त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करण्यासाठी प्रत्येकी ५ हजार रुपयांच्या धनादेशाचे वाटप करण्यात आले. नवी मुंबईतून प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांना १० हजार रुपये धनादेश देण्यात आला.

### नूतन मराठी विद्यालयात योग दिन

**नवी मुंबई :** एन सी आर डी संचलित नूतन मराठी विद्यालय नेरूळ नवी मुंबई येथे योग दिनानिमित्त योग विज्ञान संस्थान नवी मुंबई आयोजित योग दिन झाला. प्रास्ताविक व सूत्रसंचालन सुनिल पाटील सर यांनी केले. योग दिनानिमित्त योग विज्ञान संस्थेचे प्रमुख बी.बी.सिंग, छाया वारे, खोत, मीरा जाधव यांनी विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनात योगाचे महत्त्व व योग साधना अभ्यासात त्याचा कसा उपयोग होईल याचे प्रशिक्षण दिले. विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रदीप कांबळे, शिक्षक निलेश सैद, सुजाता मुंढे, लता औटी मॅडम उपस्थित होते.

### स्टर्लिंग कॉलेजमध्ये योग दिन

**नवी मुंबई :** स्टर्लिंग कनिष्ठ महाविद्यालय, नेरूळ येथे दिमाखदार पद्धतीने जागतिक योग दिवस पार पडला. या निमित्त, अपोलो हॉस्पिटल येथील डॉक्टर रीचा भार्गव, योग विशेषज्ञ, योग थेरपिस्ट तसेच ऋचा योग चे संचालक यांच्या मार्गदर्शनाखाली उत्तमरित्या पार पडला.विद्यार्थ्यांना विविध आसने तसेच योग साधना याचा अभ्यासातही उपयोग होईल असे प्रशिक्षण दिले गेले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रविवर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच विभाग प्रमुख प्रा.रेश्मा खानदेशे, जिमखाना प्रमुख अक्षय भगत आणि जिमखाना विभाग प्रमुख प्रा. जयश्री पोल यांच्या सहयोगाने यशस्वीरित्या पार पडले.

## जुईपाडा येथील उद्यानाची दुरवस्था; नागरिकांत नाराजी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

लहानग्यांना मनसोक्त खेळता यावे, ज्येष्ठांना निवांत बसता यावे आणि महिलांना रेंगाळता यावे यासाठी उद्याने उभारली जातात. जुईपाडा गावातील कै. शाहीर कृष्णा पाटील उद्यान मात्र याला अपवाद आहे. या उद्यानाची प्रचंड दुरावस्था झालेली असूनही पालिका प्रशासन मात्र दुर्लक्ष करीत आहेत. उद्यानाच्या या अवस्थेवर मात्र नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

पालिकेने केलेल्या अक्षम्य दुर्लक्षामुळे उद्यानाची हि दुर्दशा झाली असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. चारही बाजूने रहिवाशी सोसायटच्यांमध्ये असलेल्या या उद्यानाची दूर्दशा झाली आहे. या उद्यानाची देखभाल करण्यासाठी ठेवण्यात आलेला कर्मचारी वयोवृद्ध असल्याने उद्यानाची योग्य निगा राखण्यात आली नसल्याचा आरोप होत आहे.



स्थानिक नागरिकांच्या रेट्यानंतर उद्यान ठेकेदार बदलला गेला असला तरी उद्यानाची गेलेली रया मात्र परत आणता आलेली नाही. शिवाय उद्यानातली झुडपांची छाटणी नियमित होत नसल्याचे बोलले जात आहे. बऱ्याचदा उद्यानात स्वच्छता आढळून येत नाही. उद्यानात नागरिकांना चालण्यासाठी तयार केलेल्या पाथवेची दुरवस्था झाल्याने त्या ठिकाणी चालण्यास गेलेल्या नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागतो.

पालिकेने बहर आणलेल्या उद्यानाची पालिकेनेच दुर्दशा केल्याने दुरुस्ती आणि देखभाली पेक्षा नवीन टेंडर काढून करदात्यांचा पैसा उधळण्यासाठी असे प्रकार केले जात असल्याची चर्चा जुईनगरचे नागरिक करत आहेत.

याबाबत आम्ही सातत्याने उद्यान दुरुस्तीची मागणी केली आहे. मात्र दुरुस्ती लवकरच करणार असल्याचे सांगण्यात येते. तर पालिकेच्या नवीन कार्यप्रणाली येऊ घातल्याने कामांना उशीर होत असल्याचे आम्हाला सांगण्यात येते, असे माजी नगरसेविका तनुजा मढवी सांगितले.

## टेम्पोच्या धडकेत एकाचा मृत्यू

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आयशर टेम्पो वरील चालकाने कारला धडक देऊन एका अनोळखी व्यक्तीदेखील धडक दिली. या अपघातात तिघेजण जखमी झाले तर अनोळखीव्यक्तीचा मृत्यू झाला. याप्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात आयशर टेम्पो (एम एस ४६ सी एल १४०८) वरील चालक मोहम्मद बबलू मुबारक अन्सारी (रा.झारखंड) याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला तर अनोळखी इसमाच्या नातेवाईकांचा शोध पोलीस घेत आहेत.

कार (एमएच १० बीए ४२५१) या वाहनातून एक्सप्रेस वे पुणे मुंबई लेनने मुंबई येथे असिफ मुल्ला कुटुंबियांसह जात होते. त्यावेळी त्यांना उलट्या होत असल्याने त्यांनी गाडी रस्त्याच्या डाव्या बाजूला उभी केली. या वेळी आदई गाव जवळ आयशर टेम्पो (एमएच ४६ सीएल १४०८) या वाहनावरील चालकाने वाहन वेगाने चालवले आणि कारला पाठीमागून ठोकर मारली. यात जुलैका दाऊद मुल्ला, अनारकली दाऊद मुल्ला, उमर दाऊद मुल्ला हे जखमी झाले. याच दरम्यान या टेम्पोने अनोळखी वाटसरू इसमाला धडक दिली.

या धडकेत त्याचा जागीच मृत्यू झाला. या अनोळखी पुरुषाचे वय अंदाजे चाळीस वर्षे असून त्याचा रंग सावळा, उंची पाच फूट पाच इंच आहे. तो शरीराने सडपातळ असून चेहरा उभट, डोक्याचे केस काळे, नाग फुगलेले आणि डोळे काळे आहेत. याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक सोमनाथ मदने अधिक तपास करत आहेत.

## प्रबळ शाळेला जागा मिळण्याबाबत निवेदन



**रसायनी : प्रतिनिधी**

मोहोपाडा परिसरात प्रबळ शाळेला जागा मिळावी याचे निवेदन महिला मंडळ प्रबळ शाळेच्या सर्व प्रतिनिधीनी आमदार महेश बालदी यांची भेट घेऊन आमची शाळा वाचवा किंवा आम्हाला लीजवर शाळा करून द्या, अशा मागणीचे निवेदन सादर केले आहे.

प्रबळ शाळा ही फार जुनी शाळा असून ही सर्व महिला मंडळ चालवत आहे. येथे फी माफक असून गरीब विद्यार्थ्यांसाठी ही शाळा आहे. फी कमी व शिक्षण चांगले दिले जाते. ही शाळा १९७८ पासून सुरू आहे. आता इमारतीस डागडुजी करणे आवश्यक आहे, पण ती करता येत नाही तसेच काही ग्रामस्थ त्रास देतात अशी तक्रार करण्यात आली आहे.

या शाळेत १३५० मुले शिकत आहेत. इमारतीस आता धोका संभवतो, म्हणून आम्हाला जागा मिळावी, असे या निवेदनात म्हटले आहे. या वेळी आमदार महेश बालदी यांनी मी लक्ष घालतो व सर्व प्रकारच्या कामासाठी मी होईल तेवढी मदत करतो, असे सांगितले आहे.

## उरण तालुक्यातील दिव्यांगांसाठी योग शिबिर

**उरण : बातमीदार**

रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यामधील जवाहरलाल नेहरू पोर्ट अंतर्गत उरण तालुक्यामधील दिव्यांग बांधवांसाठी आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधत योग सप्ताह अंतर्गत शिबिर राबवण्यात आले.

दरवर्षी २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा केला जातो.योग म्हणजे शरीर, मन आणि आत्मा यांचे संतुलन. सदर योग दिन साजरा करण्यामागील जेएनपीटी पोर्ट च्या वरिष्ठ प्रबंधक मनीषा जाधव मॅडम यांनी यावर्षी एक विशिष्ट उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवत हा दिन दिव्यांगांकरिता साजरा करण्याचे ठरवले. तन आणि मन जेव्हा योगाने सजते तेव्हा आयुष्य खरच आरोग्याने भरते. याच प्रमाणे दिव्यांग बांधवांकरीता या योगा शिबिरामध्ये उरण तालुक्यातील तब्बल १०० हुन अधिक दिव्यांग भर पावसात उपस्थित राहिले. याप्रसंगी दिव्यांगांकरिता अल्पोहार आणि १०० टी-शर्ट ही देण्यात आल्या.



या योग दिनाच्या कार्यक्रमांमध्ये प्रत्येक दिव्यांगाने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कारण इथे या कार्यक्रमाला येणारा सामान्य नागरिक नसून दिव्यांग होता.

शिवयोग चॅरीटेबलचे योगा प्रशिक्षक संतोष बहिरा, संगीता पाटील, बेला आगलावे तसेच उरण सामाजिक संघटनेचे पदाधिकारी आणि जेएनपिटीचे ट्रस्टी भूषण पाटील, दिव्यांग सामाजिक संघटनेचे सर्व शिलेदार उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता संघटनेचे सल्लागार मदन पाटील यांनी केले. आयोजक जवाहरलाल नेहरू पोर्ट आणि वरिष्ठ प्रबंधक मनीषा जाधव मॅडम यांचे या वेळी आभार मानण्यात आले.

## उरणमध्ये जागतिक योग दिवस उत्साहात



**उरण : वार्ताहर**

दरवर्षीप्रमाणे यंदाही यु.ई.एस. स्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स ॲण्ड कॉमर्स आणि उरण तालुका विधी समिती व उरण बार असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'जागतिक योग दिवस' उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाला यु. ई. एस. संस्थेचे विश्वस्त सदस्य व माजी अध्यक्ष ॲड. राजेंद्र सुर्यकांत भानुशाली, स्कूल ॲण्ड ज्यु. कॉलेजच्या प्राचार्य सिमरन दहिया, माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका सोनाली म्हात्रे तसेच एम. एस. काझीज्युडिशियल मॅजिस्ट्रेट, फस्ट क्लास उरण ॲण्ड सिव्हिल जज ज्युनिअर डिव्हीजन, एस.पी. वानखेडे जॉईंट ज्युडिशियल मॅजिस्ट्रेट, फस्ट क्लास उरण ण्ड सिव्हिल जज ज्युनिअर डिव्हीजन, प्रेसिडेंट विजय लहू पाटील, उरण तालुका बार असोसिएशन व्हाईस प्रेसिडेंट, ॲड. जागृती गायकवाड, एक्स प्रेसिडेंटड पराग म्हात्रे तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.

स्कूल व कॉलेजच्या क्रिडा शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली प्राणायाम, मुद्रा, आसन, ध्यान, इत्यादी सर्व योगासने करून घेण्यात आली. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, ज्यु. कॉलेजच्या शिक्षिकेने केले. अशा रीतीने शरीर व मन सक्षम करुन, मनाला शांती देणारा 'जागतिक योग दिवस' साजरा करण्यात आला.



## विवेकानंद विद्यालयात योग दिन

**नवी मुंबई : बातमीदार**

प्राथमिक विद्यालय विवेकानंद संकुल सानपाडा या विभागाने शाळेच्या सभागृहात योग दिनाचा कार्यक्रम आयोजित केला. योग दिनाच्या दिवशी वैद्य डॉ. पल्लवी भिरूड तसेच वैद्य प्रशांत वाघमारे व त्यांचे सहकारी वैद्य प्रमुख अतिथी उपस्थित होते.

श्वासाच्या व्यायाम प्रकाराचे महत्त्व विशद केले. मुलांकडून योगनिद्रेचे प्रात्यक्षिक करून घेतले. ओंकाराचे महत्त्व विशद केले. विद्यार्थी व शिक्षक यांनी या सर्व कार्यक्रमामध्ये आनंदाने सहभाग घेतला. इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांचेदेखील योग दिनाच्या निमित्ताने व्यायाम प्रकार, प्राणायाम, ओंकार शाळेच्या पटांगणात घेण्यात आले. योग दिनाचे महत्व विद्यार्थ्यांनी समजावून घेतले.



**पनवेल : न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच विजेंद्र पाटील यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी माजी जि. प.सदस्य रवींद्र पाटील, माजी सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, उपसरपंच शैलेश पाटील, वहाळचे माजी उपसरपंच अमर म्हात्रे, गव्हाणचे माजी उपसरपंच विजय घरत, म्हसेश्वर मंदिर कमिटी अध्यक्ष सी.एल.ठाकूर, नामदेव ठाकूर, माजी उपसरपंच राजेश म्हात्रे, चंद्रकांत पाटील, सुधीर ठाकूर, रूपेश घरत, जयवंत देशमुख, यश म्हात्रे, धीरज घरत, नरेश मोकल आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**

## 'कला भूमिपुत्रांची' उद्या पनवेलमध्ये होणार सादर

**उरण : बातमीदार**

आगरी कोळी कराडी समाजातील कुंडेवहाळ गावातील कलाकार अमन कैलास वास्कर आयोजित वारसा संस्कृती आगरी कोळी कराडी कलेचा (कला भूमिपुत्रांची) पारंपरिक लोकगीते कोळीगीते आणि हास्य विनोदांचा बहारदार नजराणा आता सर्वांना अनुभवता येणार आहे.

आगरी कोळी कराडी समाजातील बरेच कलाकार आजपर्यंत यूट्यूब आणि टीव्ही सिरीयलच्या माध्यमातून बघत होते, पण आज हे सर्व भूमिपुत्र कलाकार एकत्र येऊन आपली कला थेट प्रेक्षकांपर्यंत पोहचवून रसिक प्रेक्षकांचे लाइव्ह मनोरंजन करण्यासाठी येत्या बुधवारी २५ जून २०२५ रोजी सायंकाळी ६:३० वाजता पनवेल मधील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथे येणार आहेत.

या कार्यक्रमात उपस्थित राहून सर्व कलाकारांना प्रोत्साहिक करण्यासाठी मोठया संख्येने उपस्थित राहावे, असे या कार्यक्रमाचे सर्वेसर्वा निर्माते अमन ज्योती कैलास वास्कर (कुंडेवहाळ) यांनी आग्रहाची विनंती केली असून आगरी कोळी कराडी समाजात प्रथमच सर्व कलाकार एकत्र येऊन कला भूमिपुत्रांची या कार्यक्रमाचा शुभारंभचा प्रयोग आनंदाने होणार आहेत. कार्यक्रमात उरण, पनवेल रायगडमधील सर्व भूमिपुत्र कलाकार उपस्थित राहणार आहेत.

## पनवेलमध्ये 'फॅशन फॉरवर्ड फँटेसिया'

### गार्गीज् ग्रुपच्या मासिकाचेही प्रकाशन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्त्री सशक्तीकरणाच्या दिशेने सातत्याने कार्यरत असलेल्या गार्गीज् ग्रुपने आपल्या सातव्या वर्धापनदिनानिमित्त 'फॅशन फॉरवर्ड फँटेसिया' हा कार्यक्रम पनवेलमध्ये आयोजित केला होता.


या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले गार्गीज् ग्रुपच्या नव्या मासिक 'द सॉव्हरिन रिगल टाइम्स' आणि शब्दगाथा गार्गीज्च्या वाटचालीची अंक पनवेल महापालिकेच्या नगरसेविका दर्शना भोईर व मोहिनी विक्रांत पाटील यांच्या हस्ते प्रकाशित झाला.

उपस्थित मान्यवरांनी महिलांना उद्देशून प्रेरणादायी विचार मांडले आणि विविध शासकीय योजनांची माहिती देऊन त्यांचा आत्मविश्वास बळकट केला.

ही कार्यक्रमाची मध्यवर्ती संकल्पना प्रत्येक सादरीकरणातून अनुभवता आली. सौंदर्य, आत्मभान आणि सर्जनशीलतेचा संगम घडवणारा हा सोहळा उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात अनुभवला. फॅशन वॉक, 'स्मृतींचा झोत', मासिक प्रकाशन, नृत्य-संगीत सत्र असे कार्यक्रम झाले.

या वेळी समृद्धी साखरे, लक्ष्मी साळवे, दिपाली कुराडे, निवेदिता चौधरी, प्रांजली काणे, नूतन रानडे, स्मिता झेमसे, स्वप्ना साखरे, शिल्पा चादने, नंदिनी भाटकर, कविता ठाकूर, स्वराली झेमसे, सखी गनिगा, नेहा वेंगुर्लेकर, रसिका बोडस, रश्मी मोरे आदी उपस्थित होत्या.

## हवाईसुंदरी मैथिली पाटीलच्या कुटुंबियांचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून सांत्वन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अहमदाबाद येथील विमान दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेली एअर होस्टेस मैथिली पाटील यांच्या कुटुंबियांची माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी न्हावे येथे जाऊन भेट घेतली आणि त्यांचे सांत्वन केले.

भेटीवेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासमवेत न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच विजेंद्र पाटील, माजी जि. प.सदस्य रवींद्र पाटील, माजी सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, उपसरपंच शैलेश पाटील, वहाळचे माजी उपसरपंच अमर म्हात्रे, गव्हाणचे माजी उपसरपंच विजय घरत, म्हसेश्वर मंदिर कमिटी अध्यक्ष सी.एल.ठाकूर, नामदेव ठाकूर, माजी उपसरपंच राजेश म्हात्रे, चंद्रकांत पाटील, सुधीर ठाकूर, रूपेश घरत, जयवंत देशमुख, यश म्हात्रे, धीरज घरत, नरेश मोकल, रंजना घरत, सुशील म्हात्रे, ग्रामपंचायत सदस्य रंजना पाटील, सुनीता भोईर, कमला म्हात्रे, चंद्रलेखा भोईर आदी उपस्थित होते.

दरम्यान, मैथिली पाटीलच्या कुटुंबाला या दुखा:तून सावरण्याची ताकद ईश्वर देवो, अशी प्रार्थना या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केली. या वेळी मैथिलीच्या घरातील सदस्य उपस्थित होते.

# माणगावमध्ये विजेचा खेळखंडोबा

## नागरिकांतून संताप व्यक्त

**माणगाव : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या गलथान कारभारामुळे सततच्या होणाऱ्या विजेच्या खेळखंडोब्याने माणगाव शहरातील नागरिकांतून तीव्र संतापाच्या भावना उमटत आहेत.

माणगाव शहरात पावसाचे आगमन झाल्यापासुन दररोज तासातासाला वीज पुरवठा खंडित केला जात आहे. त्यामुळे नागरिकांची व दुकानदारांची अनेक कामे खितपत पडत असतात. तालुक्यातील ग्रामीण भागातून पाच ते दहा किलो मीटरच्या अंतरावरून नागरिक व विद्यार्थी विविध कामास्तव माणगाव शहरात येत असतात.

या नागरिकांची व विद्यार्थ्यांची कामे विशेष करून सायबर केंद्र, बँका, पतसंस्थांतून विशेष कामे असतात. याठिकाणी वीज खंडित झाली असल्याने अनेकदा नेटवर्क नॉट रिचेबल दाखवीत असल्याने तसेच अनेक दुकानदारांची संगणकावरही कामे सुरू राहत असल्याने या सर्वांना या खंडित विजेचा फटका बसत आहे.



ग्रामीण भागातून येणाऱ्या नागरिकांना याचा विशेष फटका बसतो. अनेक नागरिक कंटाळून पुन्हा आपल्या घरी निघून जातात. त्यांना हेच काम करण्यासाठी पुन्हा दुसऱ्या दिवशी माणगावात यावे लागते. त्यामुळे या नागरिकांचा वेळ व पैसे वाया जातो. शिवाय दुकानदारांचेही मोठे नुकसान होऊन त्यांनाही मनस्ताप होतो. आजच्या या युगात अनेक कामे हि संगणकीकृत झाल्याने विजेची नितांत आवश्यकता असते. वीज सुरळीतपणे सुरू राहिली तरच संगणक व नेटवर्किंग व्यवस्थित राहत असते. अन्यथा वीज नसल्यास कामांमध्ये अडचण निर्माण होते.

या गोष्टीकडे महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीने गांभीर्यपूर्वक लक्ष देऊन माणगाव शहरात सतत वीज पुरवठा खंडित होणार नाही याची दक्षता घ्यावी अन्यथा नाईलाजास्तव माणगावकरांना वीज मंडळावर मोर्चा काढावा लागेल असा इशारा नागरिकांतून देण्यात येत आहे.

# कर्जत मुद्रे येथे वैकुंठ धामचे लोकार्पण

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत नगर परिषद हद्दीतील मुद्रे (बुद्रुक) गावासाठी उभारण्यात आलेल्या वैकुंठ धामचे लोकार्पण करण्यात आले. ही स्मशानभूमी सुमारे ३५ लाख रुपये खर्च करून बांधण्यात आली असून उल्हास नदीच्या तीरावर असलेल्या या स्मशानभूमीचा परिसर सुशिभीकरण करण्यात येणार आहे.

मुद्रे (बुद्रुक)साठी असलेली स्मशानभूमी पावसाळ्यात बऱ्याच वेळा पाण्याखाली जात असे. त्यामुळे तिची दुरावस्था झाली होती. पावसाळ्यात जोरदार पाऊस असला आणि गावातील एखाद्याचा मृत्यू झाला तर त्याचे अंत्यसंस्कार करण्यास अडचण येत असे. पर्याय म्हणून दहिवलीच्या स्मशानभूमीमध्ये जाऊन अंत्यविधी करावे लागत असत. ही अडचण लक्षात घेऊन ग्रामस्थ विजय मांडे, वसंत मोधळे आणि मारुती बैलमारे यांनी आमदार महेंद्र थोरवे यांची भेट घेऊन नवीन स्मशानभूमी तयार करण्याचे निवेदन दिले. त्यांनी तत्काळ प्रस्ताव करायला सांगून



लागेल तितका निधी देण्याचा शब्द दिला होता. ३५ लाख रुपये खर्च करून तयार केलेल्या समशनभूमीच्या अर्थात वैकुंठ धामच्या लोकार्पण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी माजी उपसभापती मनोहर थोरवे, माजी नगरसेवक ॲड. संकेत भासे, कर्जत शहर प्रमुख अभिषेक सुर्वे, उपशहर प्रमुख दिनेश कडू, प्रदीप वायकर, शहर संघटक नदीम खान, उद्योजक संजय कडू, युवा सेना सचिव ज्ञानेश्वर कर्णूक, रघुनाथ मोधळे, रवींद्र गुरव, अरुण बैलमारे, ज्ञानेश्वर कडू, सुमेश शेट्ट्ये, काभानुदास पालकर, प्रदीप वायकर, सोमनाथ पालकर, वैभव सुरावकर, दिलीप बैलमारे, संदीप पाटील, मल्हारी ठोसर, संदीप कर्णूक, विशाल बैलमारे, किशोर कदम, दर्शन वायकर, दीपक मोधळे, जयदीप शिंदे, योगेश थोरवे, भरत बामणे, महेंद्र जाधव, भालचंद्र कर्णूक, विश्वनाथ कर्णूक, रुपेश कर्णूक, तुषार बडेकर, भारत मुरकुटे, राजेश ठाणगे, हृषीकेश कर्णूक आदी उपस्थित होते.

# रोहा शहरात सोमनाथ ज्योतिर्लिंग यात्रेचे स्वागत

**रोहे : प्रतिनिधी**

हजारो वर्षे पुरातन असलेले सोमनाथ ज्योतिर्लिंगाचे अवशेष रोह्यात श्री श्री रविशंकर यांचे आशीर्वादाने आर्ट ऑफ लिविंगच्या माध्यमातून रोहा शहरात दर्शनासाठी दाखल झाले होते. या दर्शन यात्रेच्या निमित्ताने संपूर्ण रोहा शहर हर हर महादेवाच्या गजरात दुमदुमून निघालेली पाहायला मिळत होती. सोमनाथ ज्योतिर्लिंग यात्रेचे रोहा वासियांनी हजारोच्या संख्येने उपस्थिती लावत भक्तिमय वातावरणात स्वागत केले.

या वेळी श्री श्री रविशंकर यांचे परमशिष्य स्वामी दर्शन हाती व त्यांचे सहकारी यांचे सुमधुर वाणितील मंत्रोच्चारात झालेल्या रुद्र पूजेत शेकडो शिव भक्तांनी आपले संकल्प सिद्धिस जाण्यासाठी मनोभावे प्रार्थना केली.

सोमनाथ ज्योतिर्लिंग यात्रा दक्षिणेतील बँगलुरू वरून मार्गस्थ होत २१ जून रोजी रोहा शहरात दाखल झाली. रोहा शहराची साहित्य पंढरी म्हणून ओळख असणाऱ्या भाटे सार्वजनिक वाचनालाय येथे यात्रेचे भक्तिमय वातावरणात ढोल ताश्यांचे गजरात स्वागत करण्यात आले. त्यानंतर



स्वामी दर्शक हाती यांनी यात्रेचा उद्देश वर पवित्र पुरातन शिवालिंगाचा इतिहास आपल्या ओघवत्या वाणीने कथन केला. त्यानंतर रुद्र पूजा झाल्यानंतर ओम नमो शिवाय, हर हर महादेव च्या गजरात उपस्थित भाविकांनी पवित्र पुरातन शिव लिंगाचे दर्शन घेतले.

या वेळी आर्ट ऑफ लिव्हिंग च्या सेवकांनी गायलेल्या भगवान शिवाच्या भजना मुळे एकूणच सर्व परिसर मनाला ऊर्जा देणारे भक्तीमय झाले होते. गुरुदेव श्री श्री रवींशकर यांचे आशीर्वादाने सुरेश मगर, विजयराव मोरे, आप्पा देशमुख,अनंत थिटे, सचिन कदम, अशोक महा मुनी, अशोक थोरात, सुषमा तलवार, संदीप सावंत, कदम सर, देवळे दीदी यांनी यात्रेचे यशस्वी आयोजन करत रोहेकरांना अविस्मरणीय अनुभवाची प्रचिती दिली.

# 'विश्वनिकेतन'च्या विद्यार्थ्यांचे यश

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मे २०२५ मध्ये मुंबई विद्यापीठाकडून इंजिनिअरिंग विभागाच्या ८ सत्राच्या परीक्षा घेण्यात आल्या होत्या त्यातील कम्प्युटर सायन्स अँड इंजीनियरिंग (एआय एम एल) या विभागाचा निकाल लागला असून त्यात खालापूर कुंभवली येथील विश्वनिकेतन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट एंटरप्रेनरशिप अँड इंजिनिअरिंग टेक्नॉलॉजी या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी भरघोस यश प्राप्त केले आहे. या महाविद्यालयातील कम्प्युटर सायन्स अँड इंजीनियरिंग (एआय एम एल) या विभागाचा निकाल ९५.५२% इतका लागला.

अपूर्वा इंगळे आणि कुमारी कीर्ती हंबीर यांनी ९.७१ या एसजीपीआय सह महाविद्यालयात प्रथम तर विद्यापीठात चौथा येण्याचा मान मिळवला. जयेश थत्ते आणि सायली धुरी यांनी ९.५७ या एसजीपीआय सह महाविद्यालयात द्वितीय तर विद्यापीठात पाचवा येण्याचा मान मिळवला. अनिकेत सूर्यवंशी, हर्षद म्हात्रे, आयुष विश्वकर्मा आणि कुमारी श्रेया मनकावळे यांनी ९.२९ या एसजीपीआय सह महाविद्यालयात तिसरा आणि विद्यापीठात नववा येण्याचा मान मिळवला.

संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. संदीप इनामदार, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. आर. पाटील, उपप्राचार्य डॉ. शंकर कदम, प्रा. शिवानी अग्रवाल, विभाग प्रमुख डॉ. अंकुश पवार व इतर प्राध्यापक वर्गाणी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# जीवन विद्या मिशनतर्फे आयुर्वेदिक आरोग्य शिबिर

**कर्जत : प्रतिनिधी**


जीवन विद्या मिशन, मनस्वी ग्रुप आणि लोकमत यांच्या संयुक्त विद्यमाने कर्जत तालुक्यातील वैजनाथ येथे खेडेगावातील महिला व जेष्ठ नागरिकांच्या स्वास्थासाठी आयोजित केलेल्या मोफत आयुर्वेदिक आरोग्य शिबिरास साडेतीनशे जणांनी तपासणी करून घेऊन उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

वैजनाथ येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत मोफत आयुर्वेदिक आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. पोदार वैद्यकीय रुग्णालयाचे निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. निकेतन झोडपे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या टीमने रुग्णांची तपासणी केली.

या वेळी जिल्हा परिषद माजी सदस्य व मनस्वी ग्रुपच्या विश्वस्त आशाताई झिमुर यांनी, ' रुग्णांची सेवा करणे हेच आमच्या संस्थेचे ब्रीद आहे.' असे स्पष्ट केले. जीवन विद्या मिशनचे ग्राम समृद्धी अभियानचे प्रमुख आनंद राणे आणि दादर व डोंबिवली शाखेच्या सहकाऱ्यांनी शिबिर यशस्वी करण्यास विशेष मेहनत घेतली. विजय झिमुर यांनी आवयवदानाचे महत्व सांगितले.



# जनता विद्यामंदिरमध्ये योग दिन साजरा



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत नगरपरिषद क्षेत्रातील दहिवली येथील जनता विद्या मंदिर प्रशाले मध्ये योग दिन साजरा करण्यात आला. या वेळी शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

प्रशालेचे मुख्याध्यापक जवाहरलाल चव्हाण यांच्या मार्गदर्शन केल्या प्रमाणे क्रीडा विभाग प्रमुख प्रताप गिते व सौ वैशाली नेमाडे यांनी केलेल्या नियोजनुसार योग दिन साजरा करण्यात आला.

प्राजपिता ब्रम्हकुमारीच्या कीर्तिमाला बेन आणि बी. के. प्रमुख संतोषी या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी विदयार्थ्यांना योगा चे महत्व पटवून सांगितले. तसेच योगा चे प्रात्यक्षिक ही करून घेतले. व्यसनाकडे न वळता आरोग्य व शिक्षण यांचे आपल्या जीवनात महत्वाचे आहे हे समजावून सांगितले.

# माणिकगडावर भरकटलेल्या दोन पर्यटकांची सुटका

**खोपोली : प्रतिनिधी**

स्थानिक वाटाड्या सोबत न घेता केवळ गुगल नकाशाच्या आधारे तालुक्यातील माणिक गडावर ट्रेक साठी गेलेले ओकांर अनिल उपरे (वय २५, रा. खांदा कॉलनी, पनवेल) आणि त्याचा मित्र मिहीर (वय ३०, कामोठे नवी मुंबई) रविवारी खोल दरीत अडकून बसले होते, परंतु सुदैवाने स्थानिक गडाचे वाटाडे शिवाजी देशमुख यांच्याशी संपर्क झाल्याने दोघांची जवळपास चार तासाने सुटका झाली.

ओंकार आणि मिहिर रविवारी सकाळी आठ वाजता पनवेल हद्दीतील सवणे या ठिकाणाहून माणिक गडावर चढण्यास सुरुवात केली. पावसामुळे उगवलेले गवत, बुजलेल्या पायवाटामुळे दोघेही भरकटले. गडाची वाट सोडून दोघेही दरीतील खोल घनदाट जंगलात पोहचले. पुढे निसरड्या होत जाणाऱ्या वाटा आणि सरळसोट डोंगरकडा यामुळे मार्ग बंद झालेल्या ओंकार आणि मिहिर



यांना आपण पूर्णपणे अडकलो याची जाणीव झाली. सुदैवाने मोबाईलला रेंज असल्याने दोघांनी समाज माध्यमावर माणिक गड आणि मदत पथकाविषयी माहिती घेण्यास सुरुवात केल्यानंतर वाशिवली येथील शिवाजी देशमुख यांचा मोबाईल नंबर त्यांना मिळाला.

शिवाजी देशमुख यांच्याशी त्यांचा संपर्क झाल्यानंतर शिवाजी यांनी त्यांना लोकेशन पाठवण्यास सांगितले तसेच जवळपास पाणी व खाण्याचे साहित्य आहे का याची विचारणा केली. शिवाजी यांनी तातडीने वाशिवली गाव बाजूकडून माणिकगडावर जाण्याची सोपी वाट निवडत दोघांचा शोध सुरू केला. पावसामुळे शोध कार्यात अडथळे येत असल्याने मोबाईलवर संपर्क देखील होत नव्हता परंतु गडाची इत्यंभूत माहिती असलेले शिवाजी देशमुख यांनी सवणे बाजूच्या घनदाट दरीतील जंगलामध्ये जवळपास चार तासाच्या प्रयत्नानंतर पोहचण्यास यश मिळवले. मदतीसाठी आलेले शिवाजी यांना पाहून ओंकार आणि मिहीर त्यांनी सुटकेचा निश्वास टाकला. सुखरूप गडावरून खाली उतरल्यानंतर ओमकार आणि मिहीर यांनी देशमुख यांचे आभार मानले.

> **माणिक गडावर जाण्यासाठी तीन तालुक्यातून जाता येते.खालापूर तालुक्यातील वडगाव, वाशीवली तसेच पनवेल तालुक्यातील सवणे, जांभिवली आणि पेण तालुक्यातील घोट्याची वाडी या ठिकाणाहून गडावर जाता येते. गुगल नकाशाच्या आधारे न येता स्थानिक वाटाड्या घेतल्यास फजगत होणार नाही इतर गडाप्रमाणे या ठिकाणी काकडी पाने विक्रेते नसल्याने एकदा वाट चुकली का पुन्हा वाट मिळणे अवघड जाते. यासाठी गडावर येणाऱ्या हौशी नवशे पर्यटकांनी स्थानिक वाटाडे सोबत घ्यावेत.**
> **-शिवाजी देशमुख, वाटाड्या, वाशीवली, ता. खालापूर**

# वेलशेत येथे योग सप्ताह

**पाली : प्रतिनिधी**

श्रीमती शांतीबाई ओटरमल जैन आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज व रुग्णालय वेलशेत येथे जागतिक योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. श्रीमती शांतीबाई ओटरमल जैन आयुर्वेदिक कॉलेज व रुग्णालय (वेलशेत) नागोठणे येथे ११व्या जागतिक योग दिनाचे औचित्य साधून १६ ते २१ जून दरम्यान योग सप्ताह आयोजीत करण्यात आला. या सप्ताह अंतर्गत विविध कार्यक्रम घेण्यात आले.

या सप्ताहाची सुरवात योग वर्कशॉप ने झाली. याद्वारे विद्यार्थ्यांमध्ये योगाबद्दलत जागृती निर्माण करण्यासाठी 'एक पृथ्वी, एक स्वास्थासाठी योग' या धरतीवर व्याख्यान आयोजित करण्यात आले. योग सप्ताहामध्ये योग चॅलेंज ग्रुप स्लोगन कॉम्पिटिशन त्याचबरोबर सामान्य लोकांमध्ये योगा बद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी योग अवरनेस रॅली काढण्यात आली. शुक्रवार २० जून रोजी योग सरावाचे सत्र पार पडले. योग अभ्यासानंतर प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते बक्षिस वितरण समारंभ पार पडला.

योगसप्ताह संस्थेचे अध्यक्ष मा. किशोरजी जैन विश्वस्त मा. कार्तिकजी जैन, प्राचार्या. डॉ. ज्योती जगताप, रजिस्टार वैभव नांदगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. या सप्ताहात अर्चीस पाटील, सुचित्रा कुलकर्णी, नम्रता वेंगुर्लेकर, ज्योति जंगले, क्रांती मेटकर यांचे सहकार्य लाभले. सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अस्मिता नाईक, प्रियंका इंगोळे, प्राजक्ता गणोरकर, रवींद्र वावरे यांनी विशेष मेहनत घेतली.



# साळाव जिंदल विद्यामंदिर येथे आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा

**मुरुड : प्रतिनिधी**

जिंदल विद्या मंदिर, साळाव येथे आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात, शिस्तबद्ध वातावरणात आणि प्रेरणादायी पद्धतीने साजरा करण्यात आला. शाळेच्या क्रीडा विभागाचे प्रमुख संदीप तिवारी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्य मुकेश ठाकूर, उपप्राचार्य मंगेश बमनोटे सर, आणि शैक्षणिक समन्वयक अनीता बलयान मॅडम यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. प्राचार्य ठाकूर सर यांनी योगाचे शारीरिक व मानसिक फायद्यांवर मार्गदर्शन



करत विद्यार्थ्यांना नियमित योगाभ्यासासाठी प्रेरित केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या विद्यार्थी प्रमुख डिंपल इंडा हिने अत्यंत आत्मविश्वासाने आणि नेटकेपणाने केले. या विशेष दिनानिमित्त शाळेमध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सांस्कृतिक विभाग प्रमुख अफी बाशा मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली सादर झालेल्या 'योग डान्स' या विशेष सादरीकरणाने वातावरण भारून टाकले. योगासने आणि नृत्य यांचा सुंदर संगम पाहून उपस्थित सर्वजण भारावून गेले.

कार्यक्रमाच्या शेवटी शाळेचे क्रीडा कर्णधार स्वयम वाकडे यांनी सर्व मान्यवर, शिक्षकवृंद, आयोजक आणि विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक आभार मानले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली, आणि उपस्थितांनी देशप्रेम व एकात्मतेचा अनुभव घेतला.

हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये योगाबद्दल आत्मीयता निर्माण करणारा, सर्जनशीलता विकसित करणारा आणि शारीरिक–मानसिक आरोग्याची जाणीव करून देणारा ठरला आहे.

# निकम स्कूलमध्ये स्पर्धा परीक्षेचा फाऊंडेशन कोर्स

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव एजुकेशन ट्रस्ट संचालित एस.एस.निकम इंग्लिश स्कुल अँड.जुनिअर सायन्स कॉलजेमध्ये चालू शैक्षणिक वर्षांपासून पुढील पाच वर्षाकरिता वरदायी चॅरिटेबल ट्रस्ट रोहा यांच्या विशेष पुढाकाराने तसेच रोटरी प्रतिष्ठान खेड व एस.एस.निकम इंग्लिश स्कुल माणगाव यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांना जेईई, नीट, सीईटी, एमपीएससी आणि यूपीएससी यांसारख्या स्पर्धा परीक्षांची उत्तम तयारी करून घेण्यासाठी हा फाउंडेशन कोर्स माणगाव निकम इंग्लिश स्कुलमध्ये सुरु करण्यात आला आहे. या कोर्सचा माणगाव व तळा तालुक्यातील अधिकाधिक विद्यार्थ्यांनी लाभ घेऊन आपले भवितव्य उज्वल करा, असे आवाहन राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी केले.

माणगाव निकम इंग्लिश स्कुलमध्ये ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना



वरील स्पर्धात्मक परीक्षांची मुंबई, पुणे शहरी ठिकाणांसारख्या धरतीवर दर्जेदार व उत्तम प्रकारचे शिक्षण मिळावे हा ऊद्देश नजरे समोर ठेऊन आयोजकांनी १६ जून २०२५ रोजी फाउंडेशन कोर्स सुरू केला आहे. या कोर्सचा शुभारंभाचा कार्यक्रम १६ जूनला होणार होता, परंतु अहमदाबादमध्ये घडलेल्या विमान दुर्घटनेमुळे हा कार्यक्रम शुक्रवार दि. २० जून रोजी कुणबी भवन हॉल, निजामपूर रोड, माणगाव याठिकाणी ना.आदिती तटकरे यांच्या प्रमुख उपस्थिती उत्साहात झाला.

या कार्यक्रमास रोटरी प्रतिष्ठानचे अध्यक्ष बिपीन पाटणे,राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष सुभाष केकाणे,तालुकाध्यक्ष काका नवगणे, तहसीलदार दशरथ काळे, माजी सभापती संगीता बक्कम, माजी नगराध्यक्ष आनंद यादव, योगिता चव्हाण, णगाव एज्युकेशन ट्रस्टचे जेष्ठ संचालक सुभाष मेथा,अमोल कुलकर्णी,अँड. प्रकाश ओक, अँड.राहुल ओक, संपदा कुलकर्णी, प्राचार्या संगीता कोकाटे, केंद्रप्रमुख शंकर शिंदे, माजी उपनगराध्यक्ष रत्नाकर उभारे, संदीप खरंगटे, दिलीप जाधव, नगरसेविका सुविधा खैरे, लक्ष्मी हिलम, सोशल मीडियाच्या किशोरी हिरवे, संताजी पवार, उणेगावचे माजी सरपंच राजेंद्र शिर्के, युवा नेते सिद्धांत देसाई, चेतन गवाणकर आदींसह शिक्षकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दुसऱ्या डावात राहुल, पंतची शतके





**लीड्स : वृत्तसंस्था**

भारतीय संघ अडचणीत असताना केएल राहुल पुन्हा एकदा भारतीय संघाच्या मदतीला धावून आला आहे. पहिल्या डावात सहा धावांची आघाडी घेतल्यानंतर भारतीय संघाला चांगल्या सुरुवातीची गरज होती, पण यशस्वी जैस्वाल स्वस्तात माघारी परतला. त्यानंतर केएल राहुलने एक बाजू धरून ठेवली आणि दमदार शतक झळकावले आहे. दुसरीकडे विकेट पडत असताना ऋषभ पंतने राहुलला साथ देत त्यानेही सलग दुसऱ्या डावात शतक ठोकले.

चौथ्या दिवसाच्या खेळात राहुलने संयमी खेळीसह आपल्या कसोटी कारकिर्दीतील नववे शतक साजरे केले. या खेळीसह सुनील गावसकर, राहुल द्रविड यासारख्या दिग्गजांना मागे टाकत राहुलने इंग्लंडच्या मैदानात नवा इतिहास रचला आहे. तो भारताकडून इंग्लंडच्या मैदानात सर्वाधिक शतके झळकवणारा सलामीवीर ठरला आहे. एका शतकासह त्याने चार दिग्गजांना मागे टाकत या यादीत अव्लस्थानी झेप घेतली आहे.

इंग्लंडच्या मैदानात सलामीवीराच्या रुपात सर्वाधिक शतके झळकवणाऱ्या फलंदाजांच्या यादीत राहुल तीन शतकासह आता पहिल्या स्थानावर आहे. राहुल द्रविड, सुनील गावसकर, विजय मर्चंट आणि रवी शास्त्री या चार दिग्गजांच्या नावे इंग्लंडच्या मैदानात टीम इंडियाच्या डावाची सुरुवात करताना प्रत्येकी दोन शतकांची नोंद आहे.

ऋषभ पंतनेही इतिहास रचला आहे. कसोटी सामन्याच्या दोन्ही डावांत शतके करणारा तो पहिला भारतीय आणि पहिला आशियाई यष्टीरक्षक-फलंदाज ठरला आहे. अँडी फ्लॉवरनंतर अशी कामगिरी करणारा तो जगातला केवळ दुसरा खेळाडू आहे. हे त्याचे आठवे कसोटी शतक असून इंग्लंडमधील चौथे शतक आहे. यासह त्याने इंग्लंडच्या भूमीवर सर्वाधिक शतके करण्याच्या सचिन तेंडुलकरच्या विक्रमाशी बरोबरी केली आहे.

दरम्यान, या डावात भारतीय संघ सहा धावांची आघाडी घेऊन मैदानात उतरला. भारतीय संघाकडून सलामीला आलेला यशस्वी जैस्वाल अवघ्या चार धावा करत माघारी परतला. साई सुदर्शनने ३० धावांची खेळी केली, तर कर्णधार शुबमन गिल आठ धावांवर तंबूत परतला. उपकर्णधार ऋषभ पंत आणि केएल राहुलने मिळून दमदार भागीदारी केली.

## सीवूड्समध्येही उड्डाणपुलाखाली खेळांचे टर्फ उभारले जाणार

**नवी मुंबई : बातमीदार**

सानपाड्याप्रमाणे सीवूड्समध्येही उड्डाणपुलाखालील रिकाम्या जागेत खेळांचे टर्फ उभारले जाणार आहेत. नवी मुंबई महापालिकेने त्यास मंजुरी दिली आहे.

सीवूड्स सेक्टर ४२जवळील उड्डाणपुलाखालील जागा रिकामी पडलेली आहे. सानपाडा उड्डाणपुलाखाली उभारलेल्या खेळांच्या टर्फसारखे टर्फ उभारावे, अशी मागणी सीवूड्स येथील भाजपचे कार्यकर्ते विकास निकम यांनी नवी मुंबई पालिकेकडे केली होती.

उड्डाणपुलाखालील जागेत भिकारी आणि बेघर नागरिकांचे वास्तव्य वाढले आहे. त्यामुळे रेल्वेस्थानकाकडे ये-जा करणाऱ्या नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागतो. ते पाहता भाजपचे कार्यकर्ते



निकम यांनी उड्डाणपुलाखालील जागेत परिसरातील खेळाडूंसाठी टर्फ, व्हॉलिबॉल कोर्ट, बॅडमिंटन कोर्ट, बास्केटबॉल कोर्ट आदी सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी पालिकेकडे केली होती. त्या अनुषंगाने महापालिका प्रशासनाने या ठिकाणी टर्फ आणि इतर सुविधा उपलब्ध करून देण्याला मान्यता दिली आहे. यामुळे सीवूड्समधील मुले, नागरिकांना विविध खेळांचे कोर्ट उपलब्ध होणार असून मैदानाभावी होणारी खेळाडूंची गैरसोय दूर होणार आहे.

## ऑलिम्पिकवीर हॉकीपटू ललित उपाध्यायची निवृत्ती



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय आंतरराष्ट्रीय हॉकी खेळाडू ललित उपाध्याय याने आंतरराष्ट्रीय हॉकीमधून निवृत्तीची घोषणा केली. ललित उपाध्यायने रविवारी रात्री त्याच्या सोशल मीडियाच्या माध्यमातून निवृत्तीची माहिती दिली. तो टोकियो २०२० आणि पॅरिस २०२४ अशा दोन ऐतिहासिक ऑलिम्पिक कांस्यपदक विजेत्या संघाचा सदस्य होता.

निवृत्तीची घोषणा करताना ललित उपाध्याय याने एक्सवर पोस्ट केली. यात त्याने म्हटले की, आज मी आंतरराष्ट्रीय हॉकीमधून निवृत्ती जाहीर करतो. हा एक कठीण क्षण आहे, परंतु प्रत्येक खेळाडूला एके दिवशी या कठीण क्षणाचा सामना करावाच लागतो. आपल्या देशाचे प्रतिनिधित्व करणे हा माझ्या आयुष्यातील सर्वात मोठा सन्मान आणि अभिमान होता. सर्व गोष्टींसाठी धन्यवाद!

ललित हा वाराणसीच्या शिवपूर गावातील भगतपूरचा रहिवासी आहे आणि त्याने शेकडो आंतरराष्ट्रीय सामने खेळले. त्याला २०२१मध्ये अर्जुन पुरस्कार मिळाला आहे. २०२०नंतर २०२४च्या ऑलिम्पिकमध्येही ललित भारतीय हॉकी संघाचा भाग होता. या दोन्ही स्पर्धांमध्ये भारतीय हॉकी संघाने कांस्यपदक जिंकले.

२०२०च्या टोकियो ऑलिम्पिकमध्ये देशासाठी कांस्यपदक जिंकणाऱ्या भारतीय हॉकी संघात ललितने फॉरवर्ड खेळाडूची भूमिका बजावली. कांस्यपदक जिंकल्यानंतर सरकारने त्याला क्रीडा क्षेत्रातील सर्वोच्च सन्मान अर्जुन पुरस्कारानेही सन्मानित केले होते. त्याची उत्तर प्रदेशात पोलीस उपअधीक्षक म्हणूनही नियुक्ती झाली.

## युवा आशियाई कुस्ती स्पर्धेत भारताच्या पुरुष संघालाही विजेतेपद

**वुंग ताऊ (व्हिएतनाम) : वृत्तसंस्था**

भारतीय महिला संघापाठोपाठ पुरुष संघानेही युवा (२३ वर्षांखालील) आशियाई कुस्ती स्पर्धेत फ्री-स्टाईल प्रकारात सांघिक विजेतेपदाचा मान मिळवला.

भारतीय कुस्तीगिरांची फ्री-स्टाईल प्रकारातील आंतरराष्ट्रीय स्तरावरील ही सर्वोत्तम कामगिरी ठरली. भारतीय पुरुष खेळाडूंनी १०पैकी सात वजनीगटांत पदकांची कमाई केली. यामध्ये सहा सुवर्ण आणि एका रौप्यपदकाचा समावेश आहे. महिला संघाचे यश अधिक लक्षणीय ठरले. महिला कुस्तीगिरांनी सर्व १० वजनी गटांतून पदकांची कमाई केली.

पुरुष गटातून निखिल (६१ किलो), सुजीत कलकल (६५ किलो), जयदीप (७४ किलो), चंद्रमोहन (७९ किलो), सचिन (९२ किलो), विकी (९७ किलो) यांनी सोनेरी यश मिळवले, तर जयपूरन सिंग १२५ किलो गटात रौप्यपदकाचा मानकरी ठरला.

## पुढील वनडे वर्ल्डकप रोहित, विराट खेळणे अवघड -गांगुली

**कोलकाता : वृत्तसंस्था**

इंग्लंड दौऱ्यावरील कसोटी मालिकेआधी रोहित शर्मा आणि विराट कोहलीने कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली. याआधी टी-२० वर्ल्डकप स्पर्धेनंतर दोघांनी टी-२० क्रिकेटमधून निवृत्ती घेतली होती. आता आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ही जोडगोळी फक्त वनडेत खेळताना दिसेल. दोघांचे ध्येय २०२७मध्ये रंगणारी वनडे वर्ल्ड कप स्पर्धा खेळण्याचे असेल, अशीही चर्चा रंगत आहे. दरम्यान, सुनील गावसकर यांच्यानंतर आता सौरव गांगुलीने या दोघांना आगामी वनडे वर्ल्डकप संघात स्थान मिळवणे सोपे नसेल, असे म्हटले आहे.

भारतीय संघाचा माजी कर्णधार सौरव गांगुलीने



पीटीआयशी संवाद साधताना रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्यासंदर्भात मोठे वक्तव्य केले. गांगुली म्हणाला, आपल्याला ही गोष्ट लक्षात घ्यायला हवी की, प्रत्येक खेळाडूप्रमाणे एक दिवस हा खेळ त्यांच्यापासून आणि ते या खेळापासून दूर जातील. वनडे वर्ल्डकप स्पर्धेआधी भारतीय संघ २७ वनडे सामने खेळणार आहे. वर्षाला फक्त १५ वनडे सामने खेळून टीम इंडियात जागा निश्चित करणे त्यांच्यासाठी खूपच कठीण टास्क आहे. दोघांनाही या संदर्भात काही सल्ला देण्याची गरज नाही.

या वेळी गांगुलीने विराट कोहलीच्या कसोटी निवृत्तीसंदर्भातही भाष्य केले. कोहलीचा निर्णय आश्चर्यचकित वाटला नाही. टीम इंडियासाठी ही गोष्ट चिंतेची बाबही वाटत नाही, पण त्याची रिप्लेसमेंट शोधणे हे एक मोठे आव्हान आहे, असे गांगुलीने म्हटले आहे.

## पंतचे १५० कसोटी झेल पूर्ण

### धोनी-किरमाणींच्या पंक्तीत स्थान

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



भारत आणि इंग्लंड यांच्यातील कसोटी सामन्याच्या तिसऱ्या दिवशी भारतीय संघाचा यष्टीरक्षक-फलंदाज ऋषभ पंतने मोठी कामगिरी आपल्या नावावर केली. त्याने वेगवान गोलंदाज प्रसिद्ध कृष्णाच्या चेंडूवर ऑली पोपचा झेल घेत एका विशेष विक्रमाला गवसणी घातली. पोपचा झेल पकडताच तो कसोटी क्रिकेटमध्ये १५० झेल पूर्ण करणारा केवळ तिसरा भारतीय यष्टीरक्षक ठरला आहे.

यापूर्वी हा पराक्रम केवळ भारताचे माजी यष्टीरक्षक महेंद्रसिंह धोनी आणि सय्यद किरमाणी यांनी केला आहे. पंतने ४४ सामन्यांमध्ये १५० झेलांचा टप्पा पूर्ण केला, तर धोनीने ९० सामन्यांमध्ये २५६ झेल घेतले आहेत. किरमाणी यांच्या नावावर ८८ सामन्यांमध्ये १६० झेल आहेत.

## अँडरसन-तेंडुलकर ट्रॉफीचे नाव बदलून तेंडुलकर-अँडरसन ट्रॉफी करावे

### सुनील गावसकरांचा 'स्ट्रेट ड्राईव्ह'

**लंडन : वृत्तसंस्था**

भारत वि. इंग्लंड कसोटी मालिकेला नवीन नावं देण्यात आले आहे. ही मालिका आता यापुढे अँडरसन- तेंडुलकर ट्रॉफी या नावाने ओळखली जाणार आहे. इंग्लंडचा दिग्गज वेगवान गोलंदाज जेम्स अँडरसन आणि भारताचा मास्टर ब्लास्टर खेळाडू सचिन तेंडुलकर यांच्या नावावरून या ट्रॉफीचे नाव ठेवण्यात आले आहे. भारत-इंग्लंड मालिका सुरू होण्यापूर्वी या नव्या ट्रॉफीचे अनावरण करण्यात आले, पण या ट्रॉफीच्या नावाबाबत सुनील गावसकर यांनी प्रश्न उपस्थित केला आहे.

गावसकर यांनी नुकत्याच सुरू झालेल्या 'अँडरसन-तेंडुलकर ट्रॉफी'चे नाव बदलून



'तेंडुलकर-अँडरसन ट्रॉफी' करावे, असे म्हटले आहे. ही ट्रॉफी यापूर्वी पटौदी ट्रॉफी या नावाने ओळखली जात असे.

सचिन तेंडुलकरचे योगदान आणि वरिष्ठता लक्षात घेता त्याचे नाव प्रथम आले पाहिजे, असे गावसकर यांचे मत आहे. गावसकर यांनी त्यांच्या स्तंभलेखात लिहिले आहे की, इंग्लंड आणि वेल्स क्रिकेट बोर्डाला (ईसीबी) त्यांच्या इच्छेनुसार ट्रॉफीचे नाव देण्याचा अधिकार असला तरी भारतीय क्रिकेट चाहत्यांसाठी तेंडुलकरच्या आधी अँडरसनचे नाव पाहणे धक्कादायक गोष्ट आहे.

सचिन तेंडुलकर कपिल देव यांच्यासह केवळ महान भारतीय क्रिकेटपटूच नाही, तर अँडरसनपेक्षा १२ वर्षांनी मोठा आहे. कसोटी क्रिकेटमध्ये धावा आणि शतकांच्या बाबतीत तो पहिल्या स्थानी आहे, तर एकदिवसीय क्रिकेटमध्येही सर्वांपेक्षा जास्त धावा त्याच्या नावावर आहेत.

गावसकर यांनी स्तंभात पुढे लिहिले की, कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक विकेट घेणाऱ्या गोलंदाजांच्या यादीत अँडरसन तिसऱ्या क्रमांकावर आहे आणि एकदिवसीय क्रिकेटमध्ये त्याचा रेकॉर्ड तेंडुलकरइतका चांगला नाही. तेंडुलकर हा विश्वचषक विजेत्या संघाचादेखील भाग आहे, जो अँडरसन नव्हता. अँडरसन एक उत्तम गोलंदाज होता, पण प्रामुख्याने इंग्लंडच्या परिस्थितीत आणि परदेशात त्याचा रेकॉर्ड तेंडुलकरइतका चांगला नाही. मी भारतीय माध्यमांसह सर्व भारतीय क्रिकेटप्रेमींनाही तेंडुलकर-अँडरसन ट्रॉफी म्हणण्याचे आवाहन करतो.

## दिंडीगुल ड्रॅगन्सचा थरारक विजय

**चेन्नई : वृत्तसंस्था**

तमिळनाडू प्रीमियर लीगमध्ये मिस्ट्री स्पिनर वरुण चक्रवर्तीने शेवटच्या दोन चेंडूत एक षटकार आणि एक चौकार लगावत दिंडीगुल ड्रॅगन्सला शानदार विजय मिळवून दिला. यासह संघाने एसकेएम सलेम स्पार्टन्सवर दोन विकेट्सने मात केली.

१८९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना ड्रॅगन्सना शेवटच्या षटकात ११ धावांची आवश्यकता होती. शेवटच्या दोन चेंडूत अश्विनच्या संघाला आठ धावांची आवश्यकता असताना एका नो-बॉलने सामन्याचे रूप पालटले. फ्री हिटवर चक्रवर्तीने लाँग-ऑनवर षटकार खेचला आणि अखेरच्या चेंडूवर चौकार खेचत त्याच्या संघाला दणदणीत विजय मिळवून दिला.

## पृथ्वी शॉ सोडणार मुंबई संघाची साथ

**मुंबई : प्रतिनिधी**

भारताचा युवा फलंदाज पृथ्वी शॉ गेल्या काही वर्षांपासून संघात स्थान मिळवण्यासाठी संघर्ष करत आहे. फिटनेस आणि फॉर्ममुळे त्याला संघातील स्थान गमवावे लागले आहे. आधी मुंबईने त्याला संघाबाहेर केले. त्यानंतर आयपीएल २०२५ स्पर्धेत झालेल्या लिलावात तो अन्सोल्ड राहिला. आता आगामी हंगाम पाहता त्याने मुंबई संघाची साथ सोडण्याचा निर्णय घेतला असून मुंबई क्रिकेट असोसिएशन (एमसीए)कडून एनओसीची मागणी केली आहे.

एमसीएच्या सुत्राने दिलेल्या माहितीनुसार, पृथ्वी शॉने एनओसीची मागणी केली आहे. लवकरच याबाबत निर्णय घेतला जाऊ शकतो. फिटनेस आणि खेळातील शिस्त नसल्यामुळे त्याला संघाबाहेर करण्यात आले होते. फिटनेसवर मेहनत घेण्याचा आणि वजन कमी करण्याचा सल्ला त्याला दिला गेला होता. त्याच्यासाठी फिटनेसचा प्लॅनदेखील तयार केला होता, मात्र त्याच्या फिटनेसवर कुठलाही परिणाम झालेला



नाही. त्यामुळे त्याला मुंबईच्या रणजी संघातील स्थान गमवावे लागले. त्यानंतर विजय हजारे ट्रॉफीसाठीही त्याला स्थान देण्यात आले नव्हते.

शॉ ने मुंबई क्रिकेट असोसिएशनला लिहिलेल्या पत्रात म्हटले की, कारकिर्दीतील या वळणावर मला दुसऱ्या राज्याकडून क्रिकेट खेळण्याची ऑफर मिळाली आहे. मला विश्वास आहे की, या निर्णयामुळे मी क्रिकेटपटू म्हणून प्रगती करू शकेल. त्यामुळे मी विनंती करतो की, मला आगामी हंगामात इतर राज्याच्या असोसिएशनचे प्रतिनिधित्व करता यावे त्यासाठी तुम्ही एनओसी द्यावी.

## रोहित शर्माची भावूक इन्स्टा पोस्ट



**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय संघाचा माजी कसोटी कर्णधार आणि स्टार फलंदाज रोहित शर्माने इंग्लंड दौऱ्यापूर्वी अचानक इन्स्टाग्रामवर स्टोरी शेअर करत निवृत्तीची घोषणा केली. रोहित शर्माने कसोटी क्रिकेटमधून अचानक निवृत्ती जाहीर केल्याने चाहत्यांनाही धक्का बसला. अशीच एक इन्स्टा स्टोरी रोहित शर्माने सोमवारी (दि. २३) जूनला शेअर केली. रोहितने या स्टोरीमध्ये बीसीसीआयचा लोगो असलेले हेल्मेट शेअर केले असून एक तारीखदेखील टाकली आहे.

रोहित शर्माने २३ जून २००७ या तारखेचा उल्लेख स्टोरीमध्ये केला आहे, जी तारीख तो कधीच विसरणार नाही. त्याने या दिवशी २००७मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले होते. रोहितने १८ वर्षांपूर्वी बेलफास्टमध्ये आयर्लंडविरुद्ध पदार्पणाचा एकदिवसीय सामना खेळला. सुरुवातीपासूनच त्याने आपल्या वादळी फलंदाजीने चाहत्यांची मने जिंकली.

भारतीय एकदिवसीय कर्णधाराने त्याच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर एक स्टोरी शेअर केली आहे. या स्टोरीमध्ये भारतीय संघाचं हेल्मेट आहे आणि त्यावर लिहिलंय, 'सदैव कृतज्ञ २३.०६.०७'. रोहितची ही स्टोरी अवघ्या काही मिनिटातच व्हायरल झाली. रोहितने कसोटी आणि टी-२० क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे, पण तो वनडे क्रिकेट खेळताना दिसणार आहे.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, मुख्य संपादक : देवदास मटाले. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com